श्री

# द्रौपदीस्वयंवरनाटक.

हें पुस्तक

रा. रा. सखारामबाळकृष्ण

सरनाईक

याजकडून करवून

पुणें

पेठ शनिवार मेहुणपुरा

येथें

रावजी श्रीधर गोंधळेकर यानीं

आपले

जगद्धितेच्छु छापखान्यांत

छापिलें.

मिति चैत्रवद्य १३ शके १८०६ तारणनामसंवत्सरे.

किंमत ०६ टपालखर्च ००६

या पुस्तकावर सन् १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें गोंधळेकर

यानीं सर्व प्रकारें आपला हक्क ठेविला आहे.

आवृत्ति १ ली.

श्री

# प्रस्तावना

# द्रौपदीस्वयंवरनाटक.

प्रस्तुत या नाटकांतील इतिहास लिहिण्याचें विशेष प्रयोजन दिसत नाहीं. कारण तो श्रीमद्व्यासमुनींनी महाभारतांतील आदिपर्वांत सविस्तर वर्णिला असून या भरतखंडांतील आबालवृद्ध लोकांस प्रायः विदित आहे. व त्याचें दिग्दर्शन प्रस्तुत नाटकाच्या नामनिर्देशावरून ही सामान्यतः होण्यासारखें आहे. तथापि कवीनें द्रौपदीस्वयंवराची कथा कोठपासून घेऊन तिचें पर्यवसान कोठपर्यंत केलें आहे हें पुढील विषयावरून सहज कळेल.

त्या नाटकांत पांडव लाक्षागृहांतून विदुरनिर्मित विवरानें बाहेर पडून त्या गृहदाहरूप महासंकटांतून मुक्त झाले. येथून आरंभ करून एका प्रवेशांत द्रौपदी व धृष्टद्युम्न यांची उत्पत्ति संवादाचे मिषानें वर्णन केली आहे. नंतर व्यासाची व पांडवांची भेट व त्या प्रसंगीं द्रौपदीची पांचपतींविषयींची पूर्वकथा सांगितली आहे. नंतर चित्रसेनगंधर्वाची गांठ, त्याशीं केलेलें युद्ध व पुढें केलेलें मित्रत्व सांगून पांचालपुरास पांडवांचें गमन सांगितलें आहे. नंतर सभेंत प्रतिज्ञा जिंकून ब्राह्मणवेषानें द्रौपदीचें स्वीकरण आणि मातुश्रीचे आज्ञेवरून व व्यासोक्तीवरून शेवटीं तिचा पांच प्रकारें विभाग वर्णून शेवटीं प्रकटरूपानें लग्नसमारंभ वर्णन केला आहे.

त्यांत शृंगार, वीर, करुण, अद्भुत आणि हास्य हे रस प्रसंगोपात वर्णिले आहेत.

आतां मूलकाव्य वर्णित कथेस नाटकाचें रूप देण्याचा उद्देश इतकाच आहे कीं, काव्यांतून उदार कीर्ति अशा महापुरुषांचीं चरित्रें वाचल्यापेक्षां तीं प्रत्यक्ष अभिनयपूर्वक प्रयोगांत पाहिलीं असतां प्रेक्षकांच्या मनावर त्या पुरुषांच्या सद्गुणांचा व आचरणाचा ठसा तत्काळ व दृढ उत्पन्न होतो. आणि त्यामुळें आपण त्यांचें अनुकरण करावें अशी बुद्धि उत्पन्न होते. हें जाणून आम्हीं हें नाटक तयार करविलें आहे. तर यास सर्व समंजस लोक आश्रय देतील अशी आशा आहे.

रावजी श्रीधर गोंधळेकर.


श्री

# द्रौपदीस्वयंवरनाटक.

## स्थळ

## रंगभूमि.

पात्रें- सूत्रधार, माधवी, गणपति, सरस्वती.



## मंगलाचरण

### पद.

( नाहिंजाहले षण्मास मला राज्य सोडुनी॥ नोंचिविप॰ )

.सदयहृदय पूर्णब्रह्म श्रीविनायका॥ शंकरसुत लंबोदर
सौख्य दायका॥ ध्रु॰॥ भवजलनिधिमाजिविभो तरणि
तूंजना॥करुणाकर धांव विभोपतित पावना॥ विश्ववं-
द्यविश्वाद्या पदनतावना॥ चाल॥ भक्त तारका॥ सदय.

हृदय पूर्णब्रह्म श्रीविनायका ॥ १ ॥ शूर्पश्रुति वक्रतुंड आ-
खुवाहना ॥ सिंदुररिपुवरदपाणि कष्टनाशना ॥ सखारा-
मसेव्य पदा त्रिदशनंदना ॥ अघविनाशका ॥ सदय हृ-
दयपूर्ण० ॥ २ ॥ ॥ ७ ॥ ॥

पद २ (हरिभजनावीण काळ घालवूं नको०)

कमलाधव पाहिलरें वासुदेव देवा ॥ ध्रु० ॥ चिदानंद महा-
राज ॥ ज्यासि नमिति सुर समाज ॥ त्रिजगपाल गोप बा-
ल होसि केशवा ॥ कमलाधव० ॥ १ ॥ दीनबंधु सौख्य-
सार ॥ पूर्णब्रह्म निर्विकार ॥ व्याप्त तसा व्यापक जगिं तूं-
चि माधवा ॥ कमलाधव० ॥ २ ॥ सखाराम घनश्याम ॥
पूरित निजभक्त काम ॥ पतिताकरि पूतनाम ॥ शमविंधा
भवा ॥ कमलाधव पाहिलरें वासुदेव देवा ॥ ३ ॥ ॥

(मंगलाचरण झाल्यावर.)

सूत्रधार०- सकल गुणालंकृत भो विद्वज्जनशिखामणि सज्जन हो, हरिभक्ति परायण एका अर्वाचीन कवीनें रचिलेलें द्रौपदी स्वयंवराख्य नाटक आपल्या अग्रभागीं करून दाखविण्याचा निश्चय आह्मीं केला आहे तर सर्वांनीं या माझ्या परिश्रमाचें सार्थक करावें. आणि अवधान रूप पारितोषिक द्यावें हेंच मागणें आहे. (असें ह्मणून पडद्याकडे अवलोकन करून) मित्रोत्तमा, आतां कां बरें विलंब लाविला आहेस! सत्वर ये.

माधवी०- (रंगभूमीवर येऊन) भागवता, काय आज्ञा आहे.

सूत्रधार०- वनचरा, आज मी या सभाजनांच्या सन्मानार्थ द्रौपदी स्वयंवराख्य नाटक करून दाखविणार आहें तेव्हां तूं सिद्ध होऊन ये.

माधवी०- अहो सूत्रधार, मला कां टाकमटिका करावयाचा आहे हा पहा तुमच्या जवळ सिद्ध होऊनच मी आहें. आतां तुह्मांस जें कार्य पाहिजे तें सांगा.

सूत्रधार०- बरें तर आतां नाटक विघ्न शमनार्थ गजाननाचें स्मरण करितों सर्व व्यवस्था उत्तम प्रकारची ठेव, (असें ह्मणून स्मरण करितो)

पद. (गजानना दे दर्शन सत्वर० या चा०)

गजानना श्रीशंकर तनया ॥ पावेंमजला सकरुण हृदया ॥
देवा हेरंबा अमरनाथा ॥ धांवें तूं आतां ॥ ध्रु० ॥ तुजवि-
णमजला नाहीं कोणी ॥ जैसें मत्स्यालागीं पाणी ॥ ह्या-
लोंसंसारीं अस्तचि देवा ॥ घ्या मत्सेवा ॥ गजानना० ॥
सगुणा चिद्रूपा करुणासारा ॥ सुखसिंधो बा जगदुद्धा-
रा ॥ मातें संरक्षी अघमल नाशा ॥ श्रीपरमेशा ॥ गजा
नना० ॥ २ ॥ ऋद्धिसिद्धि पतिसिंदुरमथना ॥ धांवे ताप
त्रयभवशमना ॥ करितों चिंतन मी सद्भावें ॥ कीर्तनीं स-
द्यश गावें ॥ गजानना० ॥ ३ ॥ सखाराम प्रभुगुण गंभीरा
॥ अतुल विक्रमा संगर धीरा ॥ अंबामलसंभव गणपतिस्वा-
मी ॥ प्रकरें चित्सुखधामी ॥ गजानना० ॥ ४ ॥ ॥

( इतक्यांत रिद्धिसिद्धिसहित गणपति प्रगट होतो )

सूत्रधार०- गजानन महाराज, चरणकमलाचे ठायीं हा दास वंदन करितो.

गणपति०- सूत्रधारा, कल्याण. वत्सा तुला कोणचें संकट प्राप्त झालें तें नि-
वेदन कर.

सूत्रधार०- भो सकल सुर शिखामणे, या रंगसभेच्या ठायीं मी द्रौपदी स्व-
यंवर नाटक करणार आहें त्यांत नाना प्रकारचीं विघ्नें प्राप्त होतात त्यांचें निवा-
रण व्हावें विनंति ह्मणून होच.

गणपति०- वत्सा भागवता, माझ्या वरप्रसादें करून तुझ्या नाटकांत कदापि
विघ्नें येणार नाहींत हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. सूत्रधारा, वाचेची देव-
ता जी सरस्वती तिचें आवाहन कर ह्मणजे तुझी प्रस्तुत कृत्याच्या संबंधाची
मनकामना पूर्ण होईल; आतां मी स्वस्थानीं गमन करितों.

सूत्रधार०- महाराज, चरणकमलीं हा दास लीन आहे.

(नंतर गणपति निघून जातो.)

( सूत्रधार स्तवन करितो )

पद

(नाहिं झाले षण्मास मला राज्य सोडुनी ॥ तोंचि विपरित० )

नारायणि भुवनजननि प्रणतपावनी ॥ रुद्राणी पावशी-

वे अघनिवारिणी ॥ ध्रु० ॥ इंद्राणी ब्रह्म शक्ति गुह्य स्वरूपिणी ॥ कौबेरी धांव त्वरें अमरस्वामिनी ॥ वागीश्वरि पावमला वेदरूपिणी ॥ खलविनाशिनी ॥ नारायणि० ॥ १ ॥ पाशांकुश शंखचक्र शूल धारिणी ॥ कालिमहा कमला तूं महिषमर्दिनी ॥ महा सरस्वती अये भक्तरक्षिणी ॥ मृगपवाहिनी ॥ नारायणि० ॥ २ ॥ स्थिर चरिं तूं व्यापक गे पाव अज मला ॥ भवसागरिं मग्न बहू जीव त्रासला ॥ रसनाग्रीं वसुनि वदवि काव्य सत्कला ॥ मोक्षदायिनी ॥ नारायणि० ॥ ३ ॥ बाळकृष्ण तनय सखाराम दास हा ॥ कृपादृष्टि करुनि स्वयें कौतुकें पहा ॥ हृदयपुटीं येउनियां तूं सुखें रहा ॥ धांव धांवणी ॥ नारायणी० ॥ ४ ॥

(सरस्वती प्रगट होते.)

**सूत्रधार०**— हे जगज्जननी, चरणकमलाचे ठायीं वंदन करितों.

**सरस्वती०**— वत्सा भागवता कल्याण. माझ्या आगमनाची इच्छा किमर्थ केलीस? असें तुला संकट कोणतें प्राप्त झालें तें निवेदन कर.

**सूत्रधार०**— जगदंबिके, आतां मी या रंगभूमिकेवर द्रौपदी स्वयंवर नाटकाचा अभिनय करून प्रेक्षकांचें मनोरंजन करणार आहें. त्यास माझीं अज्ञान बालकें या सभेंत कशीं भाषणें करितील अशा काळजींत होतों. ह्मणून आपल्या चरणाचें स्मरण केलें. आतां मनोभिलषित कामना परिपूर्ण करणार आपण समर्थ आहांत.

**सरस्वती०**— भागवता, माझ्या वरदानें करून तुझीं बालकें सुरगुरुसमान भाषणें करून सभाजनाचें मनोरंजन करितील. हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. आतां मी स्वस्थानीं गमन करितें.

**सूत्रधार०**— मातुश्री, वंदन करितों. (नंतर सरस्वती निघून जाते.)

**विदूषक०**— कां सूत्रधार बावा, झालें कां नाटक, आतां मालवा तर दिवे, झाडा जाजम, चला घरीं, ह्मणजे झालें.

**सूत्रधार०**— अरे वेड्या असें विपरीत भाषण कां बरें करितोस? पहा आतां हें मंगलाचरण झालें. नाटक होणें तें पुढेंच आहे.

माधवी०- बरें आतां, आपण नाटक तरि कोणचें करणार तें सांगा पाहूं
सूत्रधार०- वनचरा, या रंगस्थळीं आतां द्रौपदी स्वयंवर करणार आहें तेव्हां तूं पूर्ण साह्य कर ह्मणजे झालें.
माधवी०- याप्रसंगीं मी तुह्मांस मदत करितों परंतु साह्य ह्मणून करणार नाहीं. हा पहा चाललों पहा.
सूत्रधार०- (मनांत) आतां करावें तरि काय? साह्य आणि मदत या दोहींचा अर्थ ऐकच आहे. परंतु या अज्ञान सिंधूला कांहींच समजत नाहीं (उघड) अहो गृहस्थ, तुमच्या ह्मणण्याप्रमाणेंच कां होईना.
माधवी०- बरें तर मीही सिद्धच आहें. परंतु संविधानक कथा आणि नाटकास कोठून आरंभ करणार तें तर सांगाल कीं नाहीं.
सूत्रधार०- सांगतों ऐक. लाक्षागृहांतून कुंती माते सहित पांडव निघाले. पुढें अरण्यांत भीमसेनानें हिडिंब राक्षसाचा वध करून हिडिंबेचें पाणिग्रहण केलें. तदनंतर एकचक्रा नगरींचे ठायीं भीमसेनानें बकासुराचा नाश करून ब्राह्मणाचें संरक्षण केलें आतां यापुढें जो प्रकार झाला तो तुला प्रत्यक्ष करून दाखवितों. चमत्कार तर पहा (असें बोलून दोघे निघून जातात.) ही प्रस्तावना झाली.


---

# प्रवेश १ ला.

## स्थळ.

### एकचक्रनगर

पात्र- धर्म- भीम- अर्जुन- नकुल- सहदेव. कुंतीमाता. आणि रामभट्ट (प्रवासी.)



पांडव कुंतीसहित बसले असतां प्रवासानें थकलेला रामभट्ट येतो.)

**रामभट्ट**०- (कुंतीस लक्षून) अहो बाई, प्रवासी ब्राह्मण आला आहे कृपाकरून रहावयास स्थल द्याल, तर माझ्यावर महत् उपकार होतील.

**कुंती**०- अहो विप्र महाराज, आतां अस्तमान झाला आहे या मंदिरांत आपण राहा म्हणजे झालें

**धर्मराज**०-(सद्भावानें) महाराज, यावें यावें; आज आमच्यावर गोपालकृष्णाचा अनुग्रह झाला म्हणून आपल्या चरणाचें दर्शन झालें यांत कांहीं संशय नाहीं. यास्थलीं स्थित व्हावें.

(रामभट्टजी कृस्थलीं जाऊन बसतात भोजन झाल्यावर शयनकरितात)

**अर्जुन**०-(मनांत) पहा हे विप्रमहाराज, मार्गक्रमण करून आले आहेत तर यांचें अनन्यभावें करून पादसंवाहन करावें म्हणजे त्यांचे श्रमपरिहार होतील. (उघड) विप्रोत्तमा, मी आपल्या चरणाचें मर्दन करितों.

**रामभट्टजी**०- आह्मी तर नित्य प्रवासीच आहोंत, तेव्हां असा आम्या

स आह्मा सारख्या दरिद्र्यास उपयोगी नाहीं. जर तुमचा आग्रह असेल तर मात्र माझा निरुपाय आहे (असें ह्मणून स्वस्थ बसतो.)

**अर्जुन०**—(मनांत) भट्टजी महाराजाच्या मनांत तर आहे परंतु ओढून चंद्रबळ आणतात (संवाद्दन करीत उघड) कां विप्रमहाराज; या प्रदेशांत आपलें गमन कोठवर आहे तें सांगावें.

**रामभट्टजी०**— सांगतों ऐका.

पद. (वस्त्रानें देह सारा सुंदरिनें झांकिला.)

पार्षत तो अहिक्षेत्रीं द्रुपदाख्यें भूपती ॥ करि राज्या मही माजी धर्मात्मा संप्रती ॥ ध्रु० ॥ पांचाली सुता त्याची सुंदर ती उपवर ॥ लावण्यें निस्तुला हे जाणा कीं महिवर ॥ मखकुंडीं जन्म पावे सुकृतोंघे सुखकर ॥ चाल ॥ सुत तैसा एक झाला परिसा हो निश्चिती ॥ पार्षत तो० ॥ १ ॥

(अशी अद्भुत कथा श्रवण करून विस्मयानें)

**पांडव०**—महाराज ही कथा आह्मांस सविस्तर सांगा. द्रुपदराजाचा पुत्र धृष्टद्युम्न आणि कन्या द्रौपदी हे अग्नीपासून वेदिमध्याचे ठायीं कसे निर्माण झाले हें मोठें अद्भुत आम्हांस वाटतें तसेंच द्रोणापासून सर्व अस्त्रविद्या धृष्टद्युम्नास कशी प्राप्त जाह्ली. आणि द्रुपद व द्रोणाचार्य मित्र असतां त्यांत भिन्नत्व कसें झालें?

(असे प्रश्न ऐकून ब्राह्मण सांगूं लागतो.)

**रामभट्ट०**—महाराज, सांगतों श्रवण करा.

**कटिबंध.**

भरद्वाजमुनि-गंगाद्वारीं-करी तपस्या-तंव तो स्नाना घृताचि आली वराप्सरा ती-सुरसरितेचें स्नान करुनियां धारण करि निज वस्त्रालागीं संतोषानें तंव पवमानें वस्त्र उडविलें-ऐसि अवस्था, पाहुनि मुनि तो-मोहित होउनि-रेत स्रवलें तें पाहुनियां-द्रोण करुनि तें, तरुपर्णाचा-त्यामधिं त्यानें रेत धरियलें-यज्ञपात्र तें-होतें ह्मणउनि-कुमर जन्मला-अकस्मात बा-द्रोणाभिध तो-पुढती वेदांगासह

त्यानें विमल कला त्या अभ्यासवुनी पूरित केला सरवा त-
याचा पृषदभिधानें नरवर होता तयासि कुमर द्रुपद जाहला
द्रोणासह तो क्रीडा करि बहु त्यायोगानें जडे मित्रता-उभ-
यांनीं तें एकेजागीं-अभ्यासिलि धनु विद्या मोदें. पुढति पृ-
षत तो-मरण पावला-राज्यासनिं तो द्रुपद बैसला कां-
हिं काल मग गत झाल्यावरि भार्गवरामापासुनियां धनु, वि-
द्यात्मक तें वित्त मिळविलें-नंतर तेथुनि, द्रुपदासन्निध-
येउनि मुनि तो-वदे तयासी पूर्वींचा मी सखा तुझा कीं-ऐ-
कुनि भाषण-भूपति बोले दरिद्र कैसा नृपसख होतो-व-
दसी मिथ्या-परिसुनियापरि कोपें तेथुनि द्रोण निघा-
ला नाश कराया प्रवृत्त झाला-त्या द्रुपदाचा द्वेष धरुनि-
मनिं वारणपुरिमधिं भीष्माप्रति ये द्रव्य देउनी तोषविलें
त्या विप्रा तेणें-निजपौत्रातें-शिष्यत्वानें अधीन करुनी-
सकळ कला गुण मंडित केलें-द्रुपद बद्ध तुम्हिं करू-
नि आणा ऐसें वदतां छात्रांसी तें पार्थें जिंकुनि हेतु पुर-
विला लज्जित होउनि-नरवर कृश बहु-होत चालिला-
चाल ॥ परिसावें सद्वृत्तासी ॥ सज्जन हो अजि सुख-
राशी ॥ १ ॥ ॥ ७ ॥

साकी.

द्रोणें द्रुपदा फारचि छळिलें हरिलें पंडुसुतांनीं ॥ तद्रा
ष्ट्रातें यास्तव दुःखित होउनि गेला रानीं ॥ १ ॥

तो द्रोणकृत पराभवानें त्रस्त होऊन भ्रमण करीत करीत गंगातीरीं आ-
ला तेथें याज व उपयाज उभयतां बंधु विप्रश्रेष्ठ तपस्वी होते.

ओंवी.

ब्रह्मांड जाळील ज्यांचा विषाद ॥ रुपालुलें देतील सुर-
पद ॥ ऋध्धिसिद्धि अगाध ॥ दासी तिष्ठती जवळीकीं ॥
॥ ४ ॥

घनाक्षरी.

श्रेष्ठ वसे काननांत ॥ उपयाज गृहीं वसत ॥ द्रुपद त्यासि

नम्र होत ॥ बद्धपाणी होउनी ॥ ५ ॥

या प्रकारची राजाची नम्रता पाहून उपयाज संतुष्ट होऊन बोलला कीं द्रुपदराजा तुझी इच्छा काय आहे? ती कथन कर तेव्हां द्रुपदराजा बोलला कीं; रणांगणीं द्रोणाचार्याचा घात करणारा असा पुत्र मला द्यावा. आणि एक कन्या अति लावण्यवती द्यावी ह्मणजे ती पार्थाची कांता होईल. ही माझी मनकामना पूर्ण झाल्यावर तुम्हांस असंख्य द्रव्य देईन. असें ह्मणून एक संवत्सर पर्यंत त्या मुनीची सेवा राजानें केली. मग उपयाज संतुष्ट होऊन ह्मणाला कीं मी तुला सर्व दिलें.

**पांडव.**- महाराज अग्रभागीं काय चरित्र जाहलें तें कथन करा,

**रामभट्टजी.**- सांगतों श्रवण करा. याज व उपयाज यांनीं द्रुपदराजाकडून यज्ञ करविला. त्याची पूर्णाहुती होतांच धृष्टद्युम्न नामक दिव्यपुत्र सुवर्णकवच मंडित, सायुध व रथारूढ असा उत्पन्न झाला. तसीच कुंडाच्या वेदींतून अपर्णांश कुमारी निर्माण झाली तेव्हां आकाशवाणी झाली कीं ही सकल स्त्रियांची स्वामिनी मृत्युलोकांत अवतीर्ण झाली आहे.

**ओंव्या.**

इच्छा योगें क्षत्रियांस अंत ॥ दुष्टभार उतरतील समस्त ॥ साह्य इसी भगवंत ॥ प्रज्ञावंत पुरुष इचे ॥ ६ ॥ पुत्र जो जाहला तुजलागुनी ॥ तो द्रोणासी मारील समरंगणीं ॥ ऐसें ऐकतां द्रुपदाचे मनीं ॥ परमानंद जाहला ॥

॥ ७ ॥ नंतर द्रुपदराजानें उभयविप्रश्रेष्ठांस पुष्कळ द्रव्य देऊन संतुष्ट केलें मग तो पुत्र व कन्या घेऊन राजा पांचाळ पुरास आला.

**पांडव.**- (असें ऐकून चिंताग्रस्त होतात.)

**रामभट्ट.**- मला अग्रभागीं जाण्याची त्वरा आहे ह्मणून मी आतां शयन करितों ह्मणजे प्रातः काळीं लौकर निघून जाण्यास बरें पडेल.

**पांडव.**- (वंदन करून) आज्ञा महाराज करावी निद्रा. आम्हीही शयनस्थान जातों.


(असें ह्मणून निघून जातात.)

# प्रवेश २रा.

## स्थळ.

### एकचक्रनगर.

पात्रें- पांडव, कुंती, व्यास, कुशाग्रबुद्धि (शिष्य)



कुंती०- (द्रुपदरायाची कथा श्रवण केल्यानें चिंताग्रस्त झालेले पुत्र पाहून) धर्मा, पूर्वीप्रमाणें आतां आपल्यास येथें भिक्षा मिळत नाहीं. यास्तव आपण येथून पांचाल देशीं जावें असें मला वाटतें. कारण त्या देशांत चांगलें सुभिक्ष आहे असें माझ्या श्रवणांत आहे. तेव्हां हे कुमारा, तुझ्या मनांत काय आहे तें कथन कर.

धर्मराज०- माते जें तुला मान्य आहे त्यांतच आमचें हित आहे परंतु हे माझे कनिष्ठ बांधव आहेत यांचें काय मत आहे हें मी जाणत नाहीं.

कुंती०- भीमार्जुन नकुल सहदेवहो. आतां येथून प्रस्थान करावें असा माझा विचार आहे तर तुमचें मत कसें आहे तें कथन करा.

भीमादिक०- हे अंब; आपण जो विचार केला तो आम्हांस मान्य आहे.

(नंतर कुंती ब्राह्मणास विचारून पुत्रांसहित जाण्याची सिद्धता करिते. इतक्यांत पांडवांच्या समाचारार्थ सशिष्य व्यास येतात.)

व्यास०- हे कुशाग्रबुद्धे, काय करावें? माझे परमाप्त पांडव हे पृथेसहित एकचक्रनगराचे ठायीं गुप्तपणें वास्तव्य करीत आहेत त्यांचा समाचार घेऊन आलें पाहिजे चल तर

कुशाग्रबुद्धि०- स्वामिमहाराज, चला तर आतां सहज मलाही पांडवांचें दर्शन होईल.

(असें ह्मणून पांडवांचे अग्रभागीं प्रगट होतात.)

पांडव०- साकी.

सन्मुख जाउनि वंदुनि चरणा प्रेमें स्तवना करिती ॥
उभे राहती बद्धपाणि ते मूर्ति निरखुनी बघती ॥ बोलति धन्य केलें हो ॥ दर्शनिं मानस धालें हो ॥

व्यास०- (प्रेमानंदानें) हे कुंतीपुत्र हो. सांगतों श्रवण करा. कोणे एके तपोवनांत महा तपोधन मुनीची कन्या परम लावण्यवती ती आपल्या पूर्वसंचित दोषाच्या योगें करून अत्यंत दुर्भगा झाली ती लावण्यसागराची केवळ लहरी असतांही पति नाहीं ह्मणून तिनें उग्र तप करून शंकराची आराधना केली एके दिवसीं ऋषिकन्येनें महादेवाचें स्तवन केलें तें असें कीं:-

पद. (राधे मुरवैरिणं०)

धांवत ये शिवहरा ॥ दयाळा धांवत ये शिवहरा ॥ विनवूं किति तरि माण विकल हा माझें तुह्मि शित करा ॥ ध्रु०॥
कन्या मी गोरटी शंकरा कन्या मी गोरटी ॥ विलंब न करीं पाव कृपाळा अनाथ मी धूर्जटी ॥ धांवत ये शिवहरा ॥ द० ॥१॥ दशभुज पंचानना ॥ दयाळा दशभुज पंचानना ॥
डमरु त्रिशूल धर पिनाकपाणी ॥ पावपतितपावना ॥ धांवत ये शिवहरा ॥ २ ॥ तपलें या काननीं दयाळा तप-

लें आकाननीं ॥ सदयहृदय तूं अंतनिरखीं नाहीं कीं मानिनी ॥ धां० ॥ ३ ॥ सखा रामप्रभु भवा ॥ दयाब्धिसखाराय प्रभु भवा ॥ भक्तकामकल्पतरुवर स्वामी पावें मज ये धवा ॥ धांव० ॥ ४ ॥

असी कन्येची स्तुति श्रवण करून शंकर प्रगट होऊन प्रसन्नचित्तानें ह्मणतात.

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

कन्ये घे वरदान इच्छित तुझें मागोनि आतां भली ॥
देतों सत्वरगे असें परिसूनी कन्या मनीं हर्षली ॥
बोलेतें वरदायका मज जरी देशी वरा तूं भवा ॥
देदेदे मज देच सुंदर पती आतांचि देवाधवा ॥ १ ॥

दिंड्या.

भर्ग बोले होतील पती पांच ॥ स्मरुनि कन्ये तुज लागिं वचन साच ॥ मागियेले मज पंचधा करूनी ॥ योग्य दिधले तुज पंच पती मानी ॥ १ ॥ अन्य जन्मीं होणार कांत पांच ॥ सोसियेला या जन्मिं तुवां जाच ॥ असें बोलुनियां शंभु गुप्त झाले ॥ ऐकराया वृत्तांत व्यास बोले ॥ २ ॥ ॥ ६५ ॥

नंतर ती कन्या द्रुपदराजाच्या कुलांत झाली, ती साक्षात देवीची कलाच आहे असें जाणावें तीच कन्या पांडव हो तुमची कांता होणार आहे याकरितां तुह्मी द्रुपदपुरी गमन करावें ह्मणजे निश्चयेंकरून तुम्हांस ती प्राप्त होईल आतां मी गमन करितों.

पांडव०- आज्ञा महाराज (असें ह्मणून वंदन करितात)

(तदनंतर व्यास अंतर्हित होतात.)

(इतक्यांत पडदा पडतो.)

प्रवेश २रा संपूर्ण ॥

## प्रवेश २ रा
### स्थळ
### अरण्य.

पात्रें- धर्म, भीम, अर्जुन, नकुळ, सहदेव, कुंती आणि गंधर्व, कुंभिनीस्त्री.



धर्म०- भीमसेना, आपल्यास व्यासनारायणाचें दर्शन झालें. तेणेंकरून मनास फारच समाधान झालें आतां अग्रभागीं गमन करावें.

भीम०- हे ज्येष्ठ बांधवा आपण जें भाषण केलें तें यथार्थ आहे. अर्जुना, मातेस घेऊन चलावें.

पार्थ०- हे वृकोदरा, माता आणि नकुळ, सहदेव यांस ग्रहण करून चलावें. मीया घोर निबिड अंधःकारांत काष्ठ प्रज्वलित करून चाललों ह्मणजे सर्वांस मार्ग दृश्य होईल.

कुंतीमाता०- बाळांनो, याचप्रमाणें करा ह्मणजे मार्गांत संकट पडणा-

र नाहीं.

पांडव०- मातुश्री, बहुत उत्तम आहे (असें ह्मणून चालूं लागतात.)

(इतक्यांत कोणी गंधर्व स्त्रियेसहित जळक्रीडा करीत असतां पांडवांचा शब्द ऐकू-न क्रोधानें चाप सज्ज करून.)

गंधर्व०- कायचमत्कार सांगावा अरे पूर्व रात्रीचा जो संध्याकाल तो सांप्रत प्राप्तझाला आहे ह्या मुहूर्त यक्ष व गंधर्व यांचा कर्मकाल सांगितला आहे आणि यावांचून जो अवशिष्टकाल राहिला तो मानवांचा कर्मकाल जा-णावा.)

ओंवी.

या काळींजेकानर॥ करितील महीवरी संचार॥ बा-
लिश जाणूनि तयाचा कर॥ ग्रहण करितों येधवां॥ १॥

(असें बोलून पांडवांजवळ जाऊन.)

साकी.

या काळीं मी भागीरथिच्या सलिला माजी असतां॥
विदित नाहिं कीं काय तुह्मांतें विवेक करितां भलता॥
आतां काय ह्मणावें या कांहीं मन्मनिं नाहिं दया॥ १॥

अंगारपर्ण नामक महा बलिष्ठ गंधर्व तो मीच माझा पराक्रम तुम्हां-स अवगत नाहीं काय! आणि या काननाचें नांव ही अंगारपर्ण असेंच आहे या स्थळांत जान्हवी आणि शोभायमान कानन आहे ह्मणून मी क्रीडा करण्या करितां आलों असतां, कोणरे तुह्मी मध्यरात्रीं येऊन मं-ध्यंतरीं विघ्न करितां, लज्जा नाहीं वाटत!!

अर्जुन०- हे दुष्टा सागर आणि भागीरथी हीं सर्वदां स्नान,पान व विहार क-रण्यास योग्य आहेत यांस कोणाचा प्रतिबंध आहे काय?

घनाक्षरी.

आह्मि सर्व शक्तिमंत॥ खला आहों बलवंत॥ शरें क-
रुनियां त्वदंत॥ करूं आज निश्चयें॥ १॥ जरी प्राण अ-
से गोड॥ तरी त्वरित मार्ग सोड॥ येई शरण तुझें कोड
॥ करिन पूर्ण मी स्वयें॥ २॥ तुझी भीति आह्मां नाहिं॥
व्यर्थ जल्पसि तूं पाहि॥ बद्ध करुनियां तुलाही॥ आहि

स्राहि वदथितों ॥ ३ ॥ ॥ ६ ॥

पहा पूर्वी ही गंगा हिमाचलाच्या एका हेमशृंगापासून उत्पन्न झाली ती सप्त प्रवाहांनीं समुद्रास मिळाली. ही गंगा, यमुना, प्लक्ष जाता, सरस्वती, रथस्था, शरयू, गोमती, आणि गंडकी या सात नद्यांचें जल जे प्राशन करितात ते सर्वपापांपासून मुक्त होतात ही गंगा देव गंधर्वा करितां आकाश गामिनी झाली आहे तिला अलकनंदा असें ह्मणतात तसीच पितृलोकीं वैतरणी नामक नदी झाली आहे जे प्राणी पापकर्मी असतील त्यांस ती उल्लंघन करण्यास अतिदुस्तर आहे ही गंगा सर्व बंधनापासून मोक्षास नेणारी असतां तिचा अवरोध करण्याविषयीं तूं कशी इच्छा धारण करितोस? तुझ्या अवरोधानें आह्मी जल स्पर्श करूं नये कीं काय?

**गंधर्व०**- (क्रोधानें चाप सज्ज करून.) मानवा, आतां सावधान ऐस- एका बाणें करून तुझा समाचार घेतों.

(असें ह्मणून अस्त्र प्रयोग करितो.)

**अर्जुन०**- गंधर्वा, आतां आग्नेय अस्त्र सोडितों. अवलोकन कर.

**गंधर्व०**- (मनांत) कायकरावें मानव वीरानें अग्न्यस्त्र सोडिलें, तेणें करून पहा माझा रथही दग्ध झाला आणि पृथ्वीतलावर पतन पावलों

(इतक्यांत अर्जुन येऊन गंधर्वास बद्ध करितो.)

**अर्जुन०**- अरे दुष्टा, मुखानें व्यर्थ वल्गना करीत होतास परंतु आतां मानवाचा पराक्रम अधिक किंवा गंधर्वाचा अधिक याचा विचार केलास काय? (असें ह्मणून धर्मराजासंनिध गंधर्वास धरून नेतो.)

**कुंभिनी०**- (पार्थानें आपला पति बद्ध करून नेला त्याचें त्राण करण्यास्तव धर्माजवळ येऊन.) गीत.

सदयहृदया करुणागारा ॥ कृपासागरा दीनोद्धारा ॥
लोकमान्या परोपकारा ॥ व्हावें साह्य मला ॥ १ ॥ तुज-
विण मजला नाहीं कोणी ॥ जैसें मच्छा लागीं पाणी ॥ या-
अबलेची सौख्य खाणी ॥ अर्पण करि साधो ॥ २ ॥ प-
तिस मुक्त ला करुनि आतां ॥ मजसि बोल वी धर्मता-
ता ॥ शरण पातलें पिता भ्राता ॥ माझा तूं बापा ॥ ३ ॥

सखारामप्रभुजैसी आपणा ॥ देईल बुध्दि संरक्षणा ॥ तैसें द्यावें मज पतिदाना ॥ पाहुनि दैन्यातें ॥ ४ ॥

धर्मराज०- ( गंधर्वस्त्रीचें भाषण ऐकून अर्जुनास. ) हे अर्जुना, संग्रामांत जो पराभूत झाला. आणि ज्यास अबला सोडवीत आहे अशा शत्रूचा कोण वध करील ? याकरितां वत्सा, या गंधर्वाची मुक्तता कर.

अर्जुन०- ( धर्मराजाचें भाषण मान्य करून. )

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित )

गंधर्वा स्वमनीं वृथा न करिबा शोकासि आतां पहा ॥
धर्मानें तुज दीधलें अभय हें सन्मान मानीं महा ॥ १ ॥

( अर्जुनाचें वचन ऐकून. )

गंधर्व०- ( उत्तरार्ध )

माझें प्राक्तन थोर आजि ह्मणुनी हा लाभ मानें भला ॥
दिव्यास्त्रें धरि चापिं नित्य भट जो झाला सखा हा मला ॥

अर्जुना मला चाक्षुषी विद्या परिज्ञान आहे. ही विद्या मनूनें सोमास दिली, सोमानें विश्वावसु गंधर्वास दिली, पुढें तीच विद्या विश्वावसूनें मला दिली ही विद्या इतर दुष्टपुरुषांस सांगितली असतां नष्ट होते याकरितां मी तशांस कथन करीत नाहीं. तूं त्या विद्येस पात्र आहेस ह्मणून तुला मात्र सांगतों ग्रहण कर या विद्येचा पराक्रम असा आहे कीं त्रैलोक्यांत जे पदार्थ आहेत ते पाहण्यास आपल्यास जर इच्छा झाली तर ते पाहिजे त्या ठिकाणीं दृष्टीस पडतात.

ओंव्या.

षण्मास एकेपदावरी ॥ तप आचरितां वनांतरीं ॥ विद्या प्राप्त होते तरी ॥ महत्प्रयासें जाणपा ॥ २ ॥ तें षाण्मासिकव्रत जाण ॥ स्वांगें मी करूनि पावन ॥ तुज करितों विद्यादान ॥ ग्रहण करी नृपराया ॥ ३ ॥

ही विद्या आम्हांस आहे ह्मणूनच तुम्हां मनुष्यापेक्षां आम्ही श्रेष्ठ. आहों. आकाशगामी देव आहेत तसेच आम्हीही आहोंत. हे धनंजया, गंधर्वजातीचे अश्वही बहुत उत्तम असतात यांचे वर्ण दिव्य असून मना-

सारिखा वेग असतो हे कधीं रुद्ध होत नाहींत.व कधीं तरुण ही होत नाहींत सर्वदा मध्यम अवस्थेंत राहतात या अश्वांची उत्पत्ति अशी आहे कीं,

कटिबंध.

वृत्र वधास्तव.पूर्वी पार्था- वज्र हरीनें- केलें होतें तें शत्रूंवरि
त्यजितां कोपें -त्याचे शत ते-विभाग झाले- ते देवांनें दि-
धले वांटुनि -लोकांमाजी यश धन जाणा-तनु वज्राची-
विप्राचा कर -हविर्द्रव्यप्रद -आहे ह्मणवुनि- तनु वज्रा
ची-जाणा बुध हो-रथवीराची-वज्ररूप कीं -त्याचे वर्ध-
ना कारण भूत जे,तुरंग जाणा- यास्तव हे हय- काम-
अखिल तव-पूरिल करितिल ॥ चाल ॥ यापरी जाणु
नि साचे ॥ पालन करिगा अश्वांचें ॥ सद्गुण परिसे यांचे ॥ १ ॥

अर्जुन०- गंधर्वोत्तमा तुला मी प्राणदान केलें ह्मणून त्याच्या प्रत्युपकारा करितो मला अश्व देतोस तर मी कदापि ग्रहण करणार नाहीं.

गंधर्व०- धनंजया असें विपरीत मनांत आणूं नको ज्यापेक्षां तूं मला प्राणदान दिलें त्यापेक्षां मीही तुला एक अवगत असलेली प्राणतुल्य विद्या देणार आणि तुझ्या जवळ अग्न्यस्त्र आहे तें ग्रहण करणार आतां तर झालें ना?

अर्जुन०- बहुत उत्तम आहे मित्रा त्वां जे मला अश्व समर्पण केलेस ते मी आपल्या रथास जोडीन. आतां तुझें माझें जें सख्य झालें आहे तें निरंतर असो.

अभंग

तुह्मांपासुनीयां भय तें कवणा ॥ होतें चित्रसेना हेंचि-
बोले ॥ १ ॥ भयाचें कारण सांग काय आहे ॥ शोधोनि
यां पाहे मनामाजी ॥ २ ॥ आह्मी वेदवेत्ते अरिचें मर्दन ॥
करणारे असून केसा आला ॥ ३ ॥ घर्षण कराया प्रवृ
त्त झालासी ॥ सांगेहे मजसी सखयारे ॥ ४ ॥

गंधर्व०- हे पांडुपुत्र हो तुह्मी संतत अग्निविरहित असून परिग्रह रहित आहांत तशांत विप्रोत्तम अग्रभागीं करून आला नाहींत,असें जाणून तुह्मांस धर्षण करावयास आलों. वस्तुतः तुह्मी कुरुवंशोद्धारक श्रेष्ठधनु-

र्धर आह्मांत हें मी जाणत आहें. आतां तुह्मी ग्रहस्थाश्रम संपादन करा, तसेंच ब्राह्मणांस पुरस्कृत करा ह्मणजे यथासुखें पृथ्वीचें पालन कराल.

**अर्जुन०-** गंधर्वश्रेष्ठा, बहुत उत्तम आहे.

साकी.

कवण करावा योग्य पुरोहित द्विजवर आम्हां सांगें॥
सकल गुणानें मंडित महिवरि सुखकारक जो वेगें॥१॥

**गंधर्व०-** पार्था देवल मुनीचा भ्राता धौम्य ऋषि नवयौवनसंपन्न उत्कोचला तीर्थी तप करीत आहे. त्यास तुह्मी आपला पुरोहित करा.

**अर्जुन०-** बरें आहे आतां तूं मला जे अश्व दिलेस ते तुझ्या जवळ असूं दे त्या अश्वाचें जेव्हां प्रयोजन पडेल तेव्हां ग्रहण करीन प्रस्तुत अस्त्र घे आणि चाक्षुषी विद्या दे (असें ह्मणून गंधर्वास अग्न्यस्त्र देतो व चक्षुर्विद्या ग्रहण करितो.)

**धर्म०-** हे अंगारपर्णा, आतां आह्मी गमन करितों. स्नेहाचें विस्मरण मात्र होऊं नये.

**गंधर्व०-** हे अजातशत्रो माझीही तशीच प्रार्थना आहे (असें बोलून वंदन करितो.) व पांडव अग्रभागीं गमन करितात.)

प्रवेश ३ रा

संपूर्ण.

---

## प्रवेश ४ था.

### स्थळ.

### बृहदारण्य.

पात्रें- धर्म- भीम- अर्जुन- नकुळ- सहदेव- कुंती- धौम्य आणि व्यास.



धर्म०- बांधव हो आतां प्रातःकाल झाला आहे तर अग्रभागीं गमन करावें.

बांधव०- आज्ञा महाराज (असें ह्मणून चालूं लागतात.)

धर्म०- भीमसेना, काय चमत्कार आहे तो पहा, नाना विध वृक्षसमूहावर पक्षिगण बसून मंजुळ मधुर शब्द करितात तसेच मृगादिक पशु स्वेच्छें करून संचार करिताहेत त्या योगानें ही वन शोभा किति रमणीय दिसत आहे।।

भीम०- हे श्रेष्ठ बांधवा. हा मंद सुगंध व शीतल वायु कसा पहा वहान आहे!

धर्म०- वृकोदरा, हें अरण्य फार मोठें आहे ह्मणून यास वृहदरण्य हें नांव अत्यंत अनुरूप आहे असें मला वाटतें

पार्थ०- धर्मदादा, आतां तें असो, चित्रसेन गंधर्वानें आपल्यास काय कथन केलें आहे? याचें स्मरण आहे काय?

धर्म०- धनंजया, खरेंच आतां मात्र सत्वर गेलें पाहिजे. कारण धौ-

ध्यमुनीचें दर्शन झालें पाहिजे.

भीम०- दादा, आतां मात्र विलंब करूनये.

धर्म०- चलावें, ( असें ह्मणून उत्कोचला तीर्थी धौम्यमुनीसंनिध पांडव जातात. )

पांडव०-(वंदन करून) भो सकल द्विजकुलमंडना, दासाची विनंति श्रवण करावी.

पद. ( बैरागी मोरा राम० )

सदया करणें आजि पुनीत ॥ ध्रु० ॥ कृपा करुनियां
यादासांतें ॥ तुह्मि निरखा स्वविनीत ॥ सदया० ॥ १ ॥
परमपावना व्हाचि पुरोहित ॥ भवरतुह्मीच मुनींत ॥ सदया० ॥ २ ॥ चरण कमलिं मी लीन दयाळा ॥ न सखा
मज अवनींत ॥ सदया० ॥ ३ ॥ सखाराम प्रभु सद्गुरु
मूर्ते ॥ हृदय तुझें नवनीत ॥ सदया० ॥ ४ ॥

धौम्य०- हे पांडवहो तुमचें स्तोत्र श्रवण करून मानसाचे ठायीं अत्यानंद झाला आहे तर तुमच्या प्रार्थने प्रमाणें आतां मी कुरुकुलाचें पौरोहित्य स्वीकारलें आहे ( असें ह्मणून वन संबंधीं कांहीं फल मूल प्रसाद देतो. )

धर्म०-( फलमूलें ग्रहण करून. ) वृकोदरा, आज धौम्य गुरूच्या प्रसादाचा एक महा लाभच झाला. याजवरून आपल्यास राज्यश्री आणि द्रौपदी प्राप्त जाहली असें समजा.

भीम०- धर्मदादा, आपण जें म्हणतां तेंच होणार, कारण ब्राह्मणांच्या आशीर्वादानें त्रैलोक्याचीही राज्यश्री प्राप्त होणार आहे. असें मीं मानितों.

( इतक्यांत स्वयंवरास जाणारे ब्राह्मण भेटतात. )

ब्राह्मण०- हे ब्रह्मचाऱ्यानो, तुह्मी कोण आहांत ? कोठें जातां ? आणि कोणच्या देशांतून आलांत हें कृपा करून आह्मांस कथन करा.

धर्मराज- ब्राह्मणश्रेष्ठहो सांगतों श्रवण करा- श्लोक ( स्वागता. )

एकचक्र नगराहुनि आलों ॥ पाहुनी मुनिपदा मनिं
धालों ॥ मायबंधु चव घे मजलागीं ॥ आणि जे द्विजवरा

मनिं वेगीं ॥ १ ॥

ब्राह्मण०- हे ब्रह्मचाऱ्यानो,

पद ( राग सारंग )

( धन्य उषा ही बाणकन्यका अति लावण्याची खाणी )

द्रुपदगृहासी जातों बटु हो स्वयंवरोत्सव निरखाया ॥
पांचाळीचा आह्मा कांहीं मिळेल मानुनि धन छाया ॥ ध्रु०
॥ पंचानन सम बांधव पंचक देवापरि अजमज गमतो ॥
पांचांतुनि ती वरिल कन्यका एका लागीं विमनता ॥ द्रु-
पद० ॥ १ ॥ ऐसें गमतें मन्मनिं बापा यास्तव कथिलें ध-
नप्राप्त ॥ होईल या तुह्मि संगति अमुच्या कार्य घडेल
बाहे त्वरित ॥ द्रुपद गृहासी० ॥ २ ॥ सखाराम प्रभुभक्त
काम परिपूरक स्फुर नरु जाणावा ॥ दिवस यामिनी चिं-
तुनि नामा सप्रेमें मनिं आणावा ॥ द्रुपद० ॥ ३ ॥

धर्मराज०- महाराज, आपण जी आनंदाची वार्ता कथन केली ती प्रत्य
क्ष दृष्टिगोचर व्हावयाचाही प्रसंग आला आहे तर आह्मी सबांधव तेथेंच
गमन करीत आहों त्यांत तुमचें दर्शन झालें हें बहुत उत्तम झालें

( नंतर ब्राह्मण निघून जातात. )

धर्मराज०- धनंजया, आतां धौम्यास पुरस्कृत करून पांचाल देशांत ग-
मन करावें.

सर्व बांधव०- आज्ञा, ( असें ह्मणून धौम्या सहित गमन करितात तों
अग्रभागीं व्यास प्रकट होतात. )

ओंवी.

पुढें विस्तीर्ण वृक्षतळवटीं ॥ व्यास बैसला जैसा धूर्जटी
॥ अक्षमालिका करि भस्मउटी ॥ भव्यमूर्ति विराजि-
त ॥ १ ॥

पांडव०- ( साष्टांग वंदन करून ) गुरुमहाराज, या अरण्यांत कृपा क-
रून दर्शन दिलें तेणें करून जो आनंद जाहला आहे तो मुखानें वर्णन क-
रवत नाहीं. श्लोक. ( पृथ्वी. )

कृपा करुनि बालकां विपिनिं यात्वरें भेटला॥ पदीन-
मन हें असो सुखनिधी मनीं दाटला॥ भवाब्धि बहु
घोरखदा गुरुवरा ह्मणूनी करा॥ दया निरखुनी पहा
निकट ठेविजे चाकरा॥ १॥

व्यास०– पांडुपुत्र हो, तुमचें कल्याण असो. तुह्मांस दुर्योधनानें ला-क्षागृहदाहादिक अनेक उपद्रव केले परंतु तुमच्यावर एक गोपाल कृष्णाची पूर्ण दया ह्मणून या घोर संकटांतून पार पडलांत. असो आतां तुमचा उदयकाल सन्निध आला आहे. द्रौपदी तुम्हांस वरण्या करितां माळ घालील तसेंच त्या उत्सवास प्रभु रामकृष्ण हे येऊन तुम्हांस दर्शन देतील कांहीं काळजी करूं नये.

पांडव०– महाराज, दासाची एक विनंति आहे.

व्यास०– युधिष्ठिरा, काय आहे ती कथन कर.

धर्मराज०– या दासाला पुनर्दर्शन कधीं होणार. कारण आह्मां दीन पामरांस आश्रय काय तो आपल्या चरण कमलाचाच. ह्मणून ह्मणतों आणखी कांहिं नाहीं.

व्यास०– धर्मराजा, अरे द्रौपदीच्या स्वयंवरास मी येणार आहें. त्याकालीं तुला येऊन भेटेन ह्मणजे झालें. तूं कांहीं काळजी करूं नको.


धर्मराज०– (बांधवांसहित वंदन करून-) महाराज, बहुत उत्तम आहे.

(व्यास अंतर्धान पावतात आणि पांडव पांचाळ नगरांत येऊन कुलालशाळेंत वास्तव्य करितात.)

प्रवेश ४ था
संपूर्ण.

## प्रवेश ५ वा
### स्थळ
### पांचाळनगर.

पात्रें– द्रुपद, सचिव, सेनापति, पुरोहित, दूत आणि प्रतिहार.



**प्रतिहार०**- राजाधिराज द्रुपदराज महाराज, आस्ते कदम मुलाजा मेहेरबान सलाम. (राजा सिंहासनावर येऊन बसतो.)

**द्रुपदराजा०**-प्रतिहारा, सचिवास पाचारण कर.

**प्रतिहार०**- आज्ञा महाराज (असें ह्मणून सचिवास घेऊन येतो.)

**सचिव०**- (वंदन करून) महाराज, काय आज्ञा आहे?

**द्रुपदराजा०**-प्रधानजी, राज्याची व्यवस्था आपण कोणत्या प्रकारची ठेविली आहे?

**सचिव०**- राजाधिराज, आपल्या आज्ञेप्रमाणें यथान्याय प्रजेचें पालन होत आहे आपण कोणत्याही गोष्टीविषयीं चिंता करूं नये.

**द्रुपद०**- अरण्यांत महा तापसी यज्ञ यागादि कर्मे करितात त्यांस वेळचे वेळीं यज्ञ सामग्री देत असतां काय?

**सचिव०**- भो सकल गुणि चूडामणे, ज्याज्या काळीं वेदविहित कर्मे करावयास सांगितलीं आहेत त्या त्या समयीं सकल सामग्री ग्रहण करून अरण्यांत जाऊन देत असतों सरकारांनीं कांहिं काळजी करूं नये.

**द्रुपद०**- बरें तें असो. सांप्रत कन्या द्रौपदी उपवर जाहली आहे परंतु काय करावें?

**श्लोक.** (शार्दूलविक्रीडित)

कोठें पांडव शोध तो मज नसे आतां करावें कसें ॥ कन्या
अर्जुनि योजिली ह्मणुनि यां दुःखाग्नि चित्तीं वसे ॥
लाक्षागेहिंच दाहिले सकळ कीं संचारभूमीवरी ॥ स-
द्भावें करिती असें न कळलें पाहि प्रभो यावरी ॥ १ ॥

(उच्छ्वास टाकून) प्रधानजी, काय करावें, आपण जी कल्पना करावी ती सिद्धीस जात नाहीं. आणि भगवदिच्छे प्रमाणें जें होणार तें होतें. तस्मात् कर्माची गती दुस्तर आहे. पहा. माझें मनांत आपली याज्ञसेनी अर्जुनास द्यावी परंतु पांडव लाक्षागृहांत दग्ध झाले असें श्रवण केलें आहे, तेव्हां करावें तरि काय?

सचिव०–(हात जोडून) महाराज, आपण असें चिंताग्रस्त होऊं नये कांहींतरी उपाय करावा ह्मणजे परमेश्वर कृपा करील.

द्रुपद०– प्रधानजी, तुह्मी ह्मणतां तेंही खरेंच आहे आतां स्वस्थ बसून परिणाम नाहीं. जर परमेश्वराची दया त्यांच्यावर असेल तर त्यांचे संरक्षण अग्नि नारायण कशावरून करणार नाहीं?

सचिव०–महाराज, आपण जें भाषण केलें तेंच सत्य आहे.

द्रुपद०–प्रधानजी, त्या दुष्ट दुर्योधनानें कपट करून पांडवांचा छळ केला। अर्जुना सारिखा पराक्रमी या भूमंडलावर अन्यवीर कोणी नाहीं. आतां ते कोठें तरी गोपाळ कृष्णाच्या कृपें करून गुप्तसंचार करीत असतील तर त्यांचा शोध लागण्या करितां, प्रथम असें करावें कीं,

## साकी.

नम्र कराया अयोग्य मनुजा ऐसें धनु ठेवावें ॥ गगनीं कृ-
त्रिम मीन लक्ष्य तें न लक्षितां भेदावें ॥ नलिकायंत्र द्वा-
रानें ॥ सोडुनि सायक सन्मानें ॥ १ ॥

अशी सिद्धता करून स्वयंवराचा घोष करावा. आणि सर्व राजपुत्रांस निमंत्रण करावें ह्मणजे अशा महत्कृत्यांत पांडवांचा सहज शोध लागेल. तर मी अशी प्रतिज्ञा करितों कीं जो वीर चाप सज्ज करून खालीं पाहून आकाशांतील लक्ष्याचा भेद करील त्यास माझी कन्या प्राप्त होईल. का योजना ठीक आहेना?

सचिव०- महाराज, आपण अशापणानें स्वयंवरोत्सव करावा असेंजें मनांत आणिलें आहे तें उत्तम आहे, आतां आज्ञे प्रमाणें सर्व सिद्धता करून राजपुत्रांस पत्रिका पाठवितों.

द्रुपद०- बहुत उत्तम आहे, सर्व सिद्धता करावी. आतां मी वसंतोद्यानांत गमन करितों.


सचिव०- आज्ञा महाराज, (असें ह्मणून दोघे निघून जातात.)

---

## प्रवेश ६ वा.

### स्थळ पांचाळपूर.

पात्रें- सूत्रधार, विदूषक.



विदूषक०- कां सूत्रधार महाराज, आज आपण फार गडबडींत आहांत, पण कांहीं विरुद्ध तर नाहींना! जेथील तेथें बंदोबस्त बरोबर आहे ना! कांहीं समजलें नाहीं ह्मणून विचारतों.

सूत्रधार०- वाहवारे! तूं तर शाहणाच आहेस. अरे पांचाल नगरांत काय स्वयंवरोत्सव चालला आहे. आणि तूं इकडे स्वस्थ बसला हेस, याला ह्मणावें तरी काय.

विदूषक०- एकूण असें कां आहे! तर मला सविस्तर वर्तमान सांगा ह्मणजे मीही दोन दिवस मिष्टान्न प्राप्तीची सोय पाहीन.

सूत्रधार०- पहा, द्रुपद राजानें असी प्रतिज्ञा केली आहे कीं जो वीर चाप सज्ज करून आकाशांतील मत्स्ययंत्राचा भेद करील त्यास मी आपली

कन्याजी द्रौपदी हिजकडून माला घालवीन. त्याचा हा समारंभ आहे.

दिंडी.

देशिंदेशीं धाडोनि पत्रि केला॥ नृपें उत्सव नगरांत पूर्ण केला॥ रंगभूमीनें भूप आणवीले॥ त्यांसि पूजुनि मंचकीं बैसवीले॥१॥ ॥ ६॥

या प्रकारें राजानें सिद्धता करवून सुंदर सभेंत राजपुत्रांचा सन्मान केला. आतां तो समारंभ अवलोकन करण्यास मी सुद्धां जाणार आहें. तुझी इच्छा असेल तर चल. उगाच मिष्टान्न व दक्षिणा कशा करितां बुडवितोस?

विदूषक०– तुह्मी स्वयंवरास जाणार. आणि मी एकटा राहूं काय? शाबास हो शाबास! एकूण खरेच तुह्मी आमचे मित्र आहांत. (हास्य करून) बरें तें असो.

सूत्रधार०– करा तर तयारी. हा मी निघालों पहा.


(असें ह्मणून उभयतां निघून जातात.)

---

## प्रवेश ७वा.

### स्थल पांचाल नगर

पात्रें – द्रुपद, धृष्टद्युम्न, कृष्ण, बलराम, द्रौपदी, शिशुपाल, कर्णादिक राजे, भट्टमंडळी.





(द्रुपदराजा, धृष्टद्युम्न व द्रौपदी यांसहित रंगसभेंत प्रवेश करितो.)

द्रुपदराजा०- धृष्टद्युम्ना, या रंगभूमीवर छपन्न देशींचे राजपुत्र आले आहेत काय?

धृष्टद्युम्न०-(हात जोडून) तात महाराज आपली लेखनाज्ञा मान्य करून सकल भूपति रंगीं प्राप्त झाले आहेत. त्यांचें आदर आतिथ्य करून योग्यतेअनुरूप सुखासनीं स्थित केले आहेत ते आपण अवलोकन करावे.

द्रुपदराजा०- वत्सा, तुझी या मंगल कार्याविषयींची उत्तम व्यवस्था पाहून मानसाचे ठायीं अत्यानंद झाला. बरें असो, बालका, महान् महान् तपोनिधि कोण कोण आले आहेत? त्यांची पूजा करून त्यांस सुस्थानीं बसविलेंस काय?

धृष्टद्युम्न०- भो सकल क्षत्रिय शिखामणे, सांगतों श्रवण करा.

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

आले तापसि थोर थोर परिसा व्यासादि ते भार्गव ॥ स-
च्छिष्या सह रंगणीं नरवरा आप्तादि ते बांधव ॥ तैसे
मागध सूत बंदिजन ते या उत्सवा पातले ॥ हारीं वा-
रण वाजि डोलति सदा जे यौवनें मातले ॥ १ ॥ ॥

(वसंततिलका.)

अंतःपुरीं तदुपरी कुतुकार्थ ताता ॥ आल्या पहा युवति

त्या नृपराज आतां॥ लग्नोत्सवास्तव गृहाप्रति येति सारे
देखा वयास्व नयनीं करव सिंधु बारे॥ २॥ ॥

द्रुपदराजा०- शाबास पुत्रा, शाबास; सर्वप्रकारें व्यवस्था तर उत्तम जाहली आहे आतां द्रौपदीस मंगलस्नान घालून व अलंकृत करून रंगसभेंत घेऊन ये आणि आपली सर्व प्रतिज्ञा सकल भूभुजांस कथन कर.

धृष्टद्युम्न०- आज्ञा महाराज, (असें ह्मणून वस्त्रभूषणीं अलंकृत अशा द्रौपदीस घेऊन येतो.) (मनांत) आतां तर ही रंगसभा परिपूर्ण भरली आहे. तेव्हां तात महाराजाच्या आज्ञे प्रमाणें सर्वांस कळविलें पाहिजे. (उघड.) हे सकल भूभुजहो, हें धनुष्य आणि हे बाण आहेत. यांस घेऊन जो या नलिका यंत्रद्वारानें पांच बाणांनीं या लक्ष्याचें भेदन करील. तो रूपानें व कुलानें योग्य असल्यास ही माझी भगिनी त्याची धर्मपत्नी होईल.

(भगिनीस) हे द्रुपदराजनंदिनी, सांगतों हें श्रवण कर.

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

ऐके द्रौपदि रंगणीं महिपती आले भलेकौतुकें॥ तत्कमें
कथितों तुला परिस गे नामें तयांचीं निकें॥ शौर्योदारगु-
णी महाविभवजे स्वांगें सदा मज्जती॥ संग्रामांबुधिमा-
जिनाशिति रिपू विख्यात ज्यांची धृती॥ १॥

लावणी.

(समज धरी कांहीं॥ हरि वांचुनि संसारीं॥ कोणाची भर करशिल सारी.)

द्रौपदी परिसे॥ रंगणीं नृप आले॥ निरखि तूं मत्संगें पहिले
॥ध्रु०॥ विभूषित झाले॥ सर्वहि भूपाळ॥ बैसले आसनिं
सोज्वळ॥ अशांतें पाहे॥ शोधुनि प्रांजळ॥ नकरि मानसिं
तळमळ॥ प्रतापी मोठे॥ खड्ग करीं भाले॥ बैसले सोडुनि-
या समले॥ द्रौपदी०॥ १॥

कटाव.

निरखि सुंदरी- राजमंदिरीं- तुझे स्वयंवरिं- सकाम अंत-
रिं- याजगतीवरि- सौख्य सागरीं- मीन परोपरि- होउनि
सत्वरिं- रंगत्वरीं- भूपति आले- बहुत शोभले- रूपव-

यानें-मदन भासले-हर्षाब्धीचे सांग मासले-नामें त्यां-
चीं परिसे आतां-मंचिं बेसले-मान धनाचें, केवल शोध-
न-श्रेष्ठ यशोधन-भूप सुयोधन-कल्यंशाचें समग्र सा-
धन-धर्माचें तें कांहिं न शोभन-शत्रु भीतिवह, दुर्विषह हि
तो-दुर्मुख वीर प्रमुख सबळगे-समरीं हर्षण-दुःप्रधर्ष-
ण-परवसु कर्षण-करी विक्रमें-इतर जयाच्या, न टि-
के उपमेः सौख्याब्धीच्या-सलिलिं तो रमे-सुरवद भूप-
ति-बलाढ्य रणिं अति-योग्य बहुत धृति-नाम विविंश-
ति-बल सागर तो-दुःशासन दे-दुःशासन रिपु-लागिं
तीव्र बहु-युयुत्सु, मारुत-भीम वेग धृत-शौर्य वैभव-श-
रण आलियां-अभय देत नव-इत्यादिक हे-धृतराष्ट्राचे
कुमर पातले-बहु बलवत्तर-अरिप्राण हर-महावीर ते-
राधासुत तो; कर्ण विक्रमी-आणि क्षत्रिय-श्रेष्ठ श्रेष्ठ ते-
सौबल शकुनी-वृषक बृहद्बल-गांधारादिक-राजकुम-
र हे-अश्वत्थामा-आणि भोज नृप-तुम्हां करितां, सभे-
पातले-बृहत नरपति-मणिमानासह-दंडधार सह-दे-
व सबल तो-जयत्सेन नृप-मेघासंधी-शंख उत्तरा-स-
हित मच्छ नृप-सुशर्मा आणि सेनाबिंदू-सुनाम आणि
क-सुवर्चा या-दो पुत्रांसह सुकेतु भूपति-सुचित्र अणि
धृति-सुकुमार तो-सेनाबिंदू-वृक हि सत्य तो-रोच-
मान अणि-सूर्यध्वज तो-चित्रायुध निल-अंशुमान नृ-
प-तीचा नंदनः महा प्रतापी-चंद्रसेन, नरनायक तैसा
आला पौंड्रिक-वासुदेव तो-भगदत्ताख्य हि-नरपति उत्त-
म-अंग वंग ते-कलिंग ताम्र हि-लिप्तक नदुपरि-पत्त-
नाधिपति-सपुत्र हि महा-रथी शल्य तो-रामे शत्रु ने श-
ल्य रूप रणिं-महा भयानक-अतुल्य विक्रम, संकर्षण
अणि-वासुदेव तो-रुक्मिणिचा सुत मन्मथ नामा-चा-
रुदेष्ण-सांबादिक जाणा-कृष्णपौत्र अनिरुद्ध विक्रः

मी- त्वमामीस्तव-आले धांवुनी- अक्रूरोद्धव-तसा
सात्यकी- इत्यादिक नृप रंगिं पातले - लक्ष्याचा तें भं-
गहि करतिल - यास्तव भद्रे- या लक्ष्याचा-भेद करिल
त्या, वरि जाउनी ॥ चाल ॥ बोधितों तुला हें भावें॥ प्रभु
सखाराम यश गावें ॥ द्रौपदी भूप निरखावे ॥ १॥

(सर्व राजे द्रौपदीमुखकमलास अवलोकन करून मोहित झाले इतक्यांत श्रीकृष्ण भगवान बलरामास बोलतो.)

**श्रीकृष्ण०-** बलराम दादा, हे सर्व राजे तर द्रौपदीमुखकमलास पाहतांच लुब्ध होऊन गेले आहेत परंतु येथें जो एक अद्भुत चमत्कार आहे तो कोणाच्या लक्षांत आला नाहीं.

**बलराम०-** गोपाल कृष्णा, काय आहे तो कथन कर.

**श्रीकृष्ण०-** दादा, या ब्रह्मवृंदांत, धर्मराज, भीमार्जुन, नकुल सहदेव असे पांचही पांडव आले आहेत ते अवलोकन करा.

**बलराम०-** (संतोषानें पाहून) गोपाल कृष्णा, मला बहुत आनंद झाला आहे, तो आतां वर्णन करवत नाहीं.

**कर्ण०-** (सर्वराजे क्रमानें धनुष्या सन्निध जाऊन परावृत्त झाले असें पाहून मनांत) अहो काय चमत्कार सांगावा! या धनुष्यापासून सकल राजपुत्र एकदम कसे पराभूत झाले. आतां मात्र क्षत्रियाचें नांव राहत नाहीं. तर आपण स्वस्थ बसून परिणाम नाहीं. कारण सर्व धनुर्धाऱ्यांमध्यें मी आपणास जर श्रेष्ठ ह्मणवितों तर हें चाप सज्ज करून यंत्राचा भेद केला पाहिजे. (उघड.) श्लोक. (इंद्रवज्रा)

पांचाल राया निजकन्यके ला॥ आणोनि लग्नोत्सव सांग केला॥ त्वां पाहिजे कीं मजशींच बातें॥ हें भेदितों यंत्रचि पाहिं यातें॥ १॥ ॥ ६॥

पद. (भोलानाथ दिगांबर हें दुःखमे.)

द्रौपदी आणविं त्वरें॥ राजा॥ द्रौपदी आणविं त्वरें॥ ध्रु०॥
मान धनाचा मेरु मी केवळ ॥ नातरि नाहिं बरें ॥ राजा०
॥१॥ एक शरानें भेदिन यंत्रा॥ कथितों हेंचि खरें ॥ राजा०

॥२॥ पाहुनियां धनु भूपति भ्याले ॥ झाले दुर्बल रे॥ राजा०
॥३॥ सखाराम विभु स्वस्थचि बसला ॥ जाणुनि वैभव रे॥
राजा०॥ ३॥

( असें बोलून रंगभूमीच्या मध्यभागीं येऊन धनुष्य सज्ज करून यंत्राचा भेद करावयास पाहतो.)

द्रौपदी०- (पुढें येऊन) पद. (अगे बाई नाहीं प्यालो पय॥ या०)

वरणें नाहीं यया॥ बाइ मज वरणें नाहीं यया॥ ध्रु०॥ कोणहा कोकिल मानविहीनचि॥ मानसिं नाहिं दया॥ बाइ मज०॥१॥ सूतकुलोद्भव नीचशिखामणी॥ वैभव नाहिं जया॥ बाइ०॥२॥ आत्मस्तुति करि नेणुनि परबळ॥ तेपोंगे लिख्या॥ बाइ मज०॥ ३॥ सखाराम प्रभु कैवारी मम॥ तसदिं का शिणया॥ बाइ मज वरणें नाहिं०॥ ४॥

कर्ण०- (द्रौपदीची धिक्कारयुक्त वाणी श्रवण करून धनुष्याचा त्याग करून स्वस्थानीं खेदयुक्त बसतो.

(नंतर चैद्यपति शिशुपाल मध्यभागीं येऊन चाप सज्ज करितो)

शिशुपाल०- (मनांत) काय चमत्कार सांगावा. पहा! महापराक्रमी क्षत्रिय या धनुष्यापासून परावृत्त झाले, आणि राजानें तर असा विलक्षण पण केला आहे. आतां करावें तरि काय? (उघड) कांहीं चिंता नाहीं या महावीराशीं गांठ आहे. द्रुपदराजा, आतां हें चाप सज्ज केलें पहा. हा भूमिपाळ तुझा जामात झाला असें समज.

पद. (भोलानाथ दिगंबर ये दुःख मे०)

चैद्यपभूपति हा॥ राजा॥ मद्भुजवीर्य पहा॥ ध्रु०॥ सर्वगुणालंकृत नृपनायक॥ याहुनि कवण महा॥ राजा०॥१॥ भेद करिन मी लक्ष्याचा मज॥ कन्या कुसुम वहा॥ राजा०॥ २॥ मत्सम नरपति नाहिं महीवरी॥ बोलति लोक दहा॥ राजा०॥ सखाराम प्रभु मच्छत्रू तो॥ पाहुनि होत दहा॥ राजा०॥ ४॥ ॥

(असें बोलून जानू टेकून कोदंड धरितांच अकस्मात भूमीवर पडतो.)

अर्जुन०– (विप्रसमुदायांत बसला असतां मनांत) पहा, सर्व क्षत्रिय या पणांत पराभूत झाले. ही राजसभा तर केवळ चित्रवत होऊन राहिली आहे. कोणाचें धैर्य होत नाहीं. बरें असो, आपण श्रीगोपाल कृष्णाचें चिंतन करून उद्योग करावा. काय परमात्मा यश देईल तें खरें. (असें ह्मणून उठतो.)

विश्वनाथ भट्ट०– (कृष्णाजिन कंपित करून) कां कृष्णं भट्टजी, काय चमत्कार सांगावा. या रंगसभेच्या ठायीं महान् महान् वीरचूडामणि, कर्ण शल्यप्रभृति क्षत्रिय श्रेष्ठ महाबलाढ्य असतां त्यांच्यानें हें चाप नम्र करवलें नाहीं. असें असतां हा दुर्बल ब्राह्मण कसा धनुष्य नम्र करील कोण जाणे. अहो नम्र झालें तर ठीकच आहे नाहींतर उगीच भट्टमंडळीची फट्ट फजिति!!

कृष्णं भट्ट०– अहो विश्वनाथ भट्टजी, याचें कारण तुह्मीं समजलां नाहीं. पहा हा ब्राह्मण तेजस्वी केसरीसारिखा गतिमान् आणि मत्त मतंगजा प्रमाणें पराक्रमी दिसत आहे. त्यापेक्षां हें कर्म त्याचे ठायीं असेल असें वाटतें. जो आपल्या शक्तीवर उत्साहयुक्त असतो तोच कांहीं कर्म करावयास प्रवृत्त होतो. फार काय सांगावें. ब्राह्मणाची गति ब्रह्मलोकापर्यंत आहे यास्तव विप्रांस असाध्य कर्म या पृथ्वीवर कोणतेंही नाहीं. कांहों सदाशिव दीक्षित, आपण या ब्रह्मसमूहांत वयोवृद्ध ज्ञानवृद्ध आहांत ह्मणून ह्मणतों, आपण तरि सांगा ह्मणजे निराकरण होईल.

सदाशिवदीक्षित०– अहो विश्वनाथ भट्ट, अहो कृष्णंभट्ट, उगाच काय वाद करितां! सांगतों ऐका– पहा ब्राह्मण दुर्बल जरी आहेत तरि ते आपल्या तपोमय तेजें करून बल संपन्न आहेत, यांत कांहीं संशय नाहीं. पहा, पूर्वी एकाकी भार्गवरामानें एकविस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. तसेंच अगस्तीनें सागराचें एकच आचमन केलें. यास्तव आतां सर्वांनी स्वस्थ बसून काय होतें तें पाहावें.

कृष्णंभट्ट०– खरी गोष्ट आहे, पण मला वाटतें.

साकी.

हा ब्राह्मण जरि बटुक असे तरि विक्रमि थोरचि आहे
करील चापा सज्ज प्रतापी या भूमीवरि पाहे॥ ऐसें वद-

तां ब्रह्मर्षी ॥ झाला सिद्ध चि राजर्षी ॥ १ ॥ ॥

(तदनंतर अर्जुन धनुष्याजवळ उभा राहून श्रीशंकराचें स्मरण करितो.)

पद. (धन्य उषा ही बाण कन्यका अति०)

जयजयशंकर चंद्रशेखरा कर्पुरगौरा मदनारी ॥ हिमनगजाधव स्मरवर वंदिति भक्तजनांचा कैवारी ॥ धृ० ॥ मायबाप तूं विश्वेशा मज कृपा करुनिया अजि पाहे ॥ तुजविण मजला नाहीं कोणी धांवत येवा लवलाहें ॥ जय० ॥ १ ॥ अदळ अभंगा करुणागारा भक्तवत्सला अमरेशा ॥ विष्णुवल्लभा योगीजन मन वासी देवा बाणेशा ॥ जयजय० ॥ २ ॥ भक्त कामकल्पद्रुमस्वामी चिंतुनि करितों कार्यातें ॥ सखाराम प्रभु हृदयीं प्रगटुनि करवि द्रौपदी भार्यातें ॥ जयजय शंकर चंद्रशेखरा कर्पुरगौरा मदनारी ॥ हिमनगजाधव स्मर वरवंदिति भक्तजनांचा कैवारी ॥ जय० ॥ ३ ॥

(याप्रमाणें शंकराचें स्तवन झाल्यावर गोपाळकृष्णाचें चिंतन करितो.)

पद. (माय ह्मणे अभिमन्यु ऐक रे मुला)

धांव पाव त्वरित माय नंदनंदिनी ॥ सदय हृदय दीनभगिनि सौख्य वर्धिनी ॥ धृ० ॥ भक्त काम कल्पलते पावगे मला ॥ राजसभे माजि पहा अठवितों तुला ॥ नतवत्सल वेद वदति तुज नसे तुला ॥ चाल ॥ सखाराम प्रभो होई प्रकट मन्मनीं ॥ धांव पाव त्वरित० ॥ १ ॥ ॥

अर्जुन०- प्रथम हरिहरांचें चिंतन झालें. आतां विलंब कशास पाहिजे!

(असें ह्मणून लक्ष्याचा भेद करितो व देव अर्जुनावर पुष्पवृष्टि करितात)

द्रुपदराजा०- (पुष्पवृष्टि पाहून मनांत.) काय हो चमत्कार सांगावा! हा आजानुबाहू कोणी तरी महावीर आहे यांत संशय नाहीं तर आपल्यास याचें साह्य केलें पाहिजे.)

(सभेंत तुमुल शब्द होत आहे तों युधिष्ठिर उभय भ्रात्यांसहित कुलालशालेंत निघून जातो.)

द्रौपदी०-(अर्जुनानें मत्स्ययंत्राचा भेद केला हें पाहून मनांत.) या महा-

वीरानें अतुल विक्रम केला या करितां मनोभावें करून यास वरिलें पाहिजे (असें ह्मणून अर्जुनाच्या कंठांत माळ घालिते.)

अर्जुन०- (संतुष्ट होऊन) आजहें कृत्य श्रीगोपाल कृष्णाचे कृपाकटाक्षानें च सिद्धीस गेलें. आतां पत्नीसहित स्वस्थानीं गेलें पाहिजे. (असें ह्मणून द्रौपदीसह सभेंतून निघून जातो.)


नंतर पडदा पडतो.

---

## प्रवेश ८ वा.

### स्थळ रंगसभेचा बाह्य प्रदेश

पात्रें- शल्य, सूर्यध्वज, रोचमानादिक, ब्राह्मण. पांडव, द्रुपद राजा. भीम, अर्जुन, श्रीकृष्ण, बळराम दादा.



(द्रुपदराजानें ब्राह्मणास कन्या दिली हें पाहून सर्व राजे क्रोधाविष्ट होतात.)

शल्य०- काय चमत्कार सांगावा. पहा आपण सकल क्षत्रिय येथें आलों असतां हा पांचाल राजा, द्रौपदी विप्रास देतो काय? तस्मात् हा मोठा दुराचारी आहे. याचा पुत्रासहित घात करावा हेंच उत्तम या पृथ्वीतलावर अधर्मकामी राजास ठेवून उपयोग नाहीं.

सूर्यध्वज०- (कोपायमान होऊन) अहो सकल क्षत्रियहो, सांगतों तें श्रवण करा. कन्येसहित या द्रुपदराजास अग्नींत टाकून आपण आपल्या राष्ट्रांत जावें हेंच योग्य आहे.

रोचमानादिक०- अहो वीरहो. पाहतां काय? अगोदर या दुष्ट द्रुपदराजाचा शिरच्छेद करा, ह्मणजे आपल्या आगमनाचें साफल्य झालें.

(असें ह्मणून सकल राजे द्रुपदराजाचा घात करण्याच्या हेतूनें अकस्मात् बाणाचा वर्षाव करूं लागतात.)

द्रुपदराजा०- (भयंकर प्रसंग पाहून) हे परमेश्वरा, पहा या महत्संकटापासून माझी मुक्तता कोण करणार आहे!

अंजनी गीत

हाहा देवा कैसें झालें ॥ सहसा संकट हें ओढवलें ॥ धर्मकेरितां कर्म अडलें ॥ काय करूं आतां ॥ १ ॥ तुजविण नाहीं मजला कोणी ॥ जैसें मच्छा लागीं पाणी ॥ जाहलों आतां केविल वाणी ॥ आणीं स्वमनांत ॥ २ ॥

शिव शिव हे परमेश्वरा, या अनाथ प्राण्याचें संरक्षण करण्यास तुझ्यावांचून दुसरा कोणी समर्थ नाहीं. (कांहींसें धैर्य धरून) आतां श्रीहरीच्या विभूति हे समस्त ब्रह्मवृंद आहेत त्यांच्या चरण कमलांस शरण जावें ह्मणजे या पंचप्राणांचें त्राण होणें असेल तसें होईल. (असें ह्मणून ब्रह्मवृंदासन्निध जाऊन)

पद. (माझी लाज तुला यदुराया.)

मज तारा हो द्विजराया ॥ धृ० ॥ त्राण करावा मत्प्राणाचें ॥ झाले नरपति अजि हे वाया ॥ १ ॥ दीन मी झालों नस्रूचे कांहीं ॥ ठेवा बापानो मजवरि माया ॥ मज तारा० ॥ २ ॥ शरणागत पदिं वंदितसे कीं ॥ जाऊं तरि मी कवण्या ठाया ॥ मज तारा हो द्वि-

जराजा॥ ३॥ सखाराम प्रभु वंदी त्वत्पद ॥ योग्य करावी करु-
णा छाया॥ ४॥ ॥

(राजा विनंति करितांच पांडव त्याचे रक्षणार्थ धांवले.)

सर्व राजे०- (आतां या ब्राह्मणांची उपेक्षा करून उपयोग नाहीं. असें ह्मणून भीमावर अकस्मात् सशस्त्र धांवतात.)

भीम०- (मनांत) शत्रूंनीं तर उपद्रव दिला आहे आतां मात्र यांचा समाचार घेतलाच पाहिजे (असें ह्मणून एक वृक्ष उत्पाटन करून अर्जुनाच्या समीप भागीं उभा राहतो.)

अर्जुन०- (भीमसेनाचें अमानुष कृत्य पाहून मनांत.) भीमदादानें तर सहायता बरीच करण्याचें मनांत आणिलें आहे. (उघड) आतां कांहीं चिंता नाहीं

श्रीकृष्ण०- (भीमार्जुनाचें कौतुक पाहून) बलरामदादा, अग्रभागीं वीरांचें शौर्य अवलोकन करा.

साकी.

दादा निरखा वीर वृकोदर भूरुह यत्करिं विलसे॥ नागा
युत बल पांडुसूनु जो मानिति रिपु ज्या सलसे॥ समीप अ-
र्जुन जाणावा॥ आप्त भाव मनिं आणावा॥ ॥

आर्या.

घेउनि चाप करामधिं॥ शोभे निभ्रांत जो उभा वीर॥ म-
त्प्राण मित्र तोची॥ राहे संगरिं धरोनि बहु धीर॥ १॥ ॥

वृक्षाचें उत्पाटन करून संग्रामांत गमन करणारा भीमसेनावांचून अन्य वीर या भूतलावर नाहीं. आणि जो पूर्वी विप्रसमूहांतून उठून गेला तो राजा युधिष्ठिर होय. आणि त्याचे पश्चात् जे निघून गेले ते नकुल सहदेव होत. असा माझा तर्क होतो. लाक्षागृहांतून पृथेसहित पांडव मुक्त झाले असें जें मीं पूर्वी श्रवण केलें तें सत्य आहे.


बलराम०- गोपाल कृष्णा, एकुण असें का आहे! त्या दुष्ट कौरवांच्या कपट पाशांतून सपुत्र आपली पितृष्वसा कुंती मुक्त झाली!! आतां ति चें दर्शन मी कधीं घेईन अशी उत्कंठा झाली आहे.

(असें ह्मणून सर्व निघून जातात.)

## प्रवेश ९वा

### स्थळ. गणपतिमहालाचा मार्ग

पात्रें- सूत्रधार, विदूषक.



विदूषक०- कांहो सूत्रधार, ज्याचे घरीं लग्नास यावें त्याच्यावर उलटून पडावें हा कोण त्या शास्त्रांतील निर्णय तो तर सांगा पाहूं.

सूत्रधार०- अरे बाबा, तुला कांहींच का माहित नाहीं? द्रुपदराजानें ब्राह्मणास कन्या दिली. ह्मणून सर्व क्षत्रिय रुष्ट होऊन त्याच्या प्राणग्रहणार्थ प्रवृत्त झाले. तेव्हां राजा घाबरा होऊन श्रेष्ठ ब्रह्मवृंदास शरण गेला.

विदूषक०- बरें अकस्मात् अशा संकटांत राजा पडला असतां ब्राह्मणांनीं त्याचें संरक्षण कसें केलें तें अगोदर सांगा ह्मणजे झालें.

सूत्रधार०- श्लोक. (इंद्रवज्रा)

पाहूनि भीमार्जुन वृत्त ऐसें॥ विप्रांतुनी तेंनि घतीच तैसे॥
त्राणार्थ त्याचे करितात युद्ध॥ जाणोनियां तो पथ सांग शुद्ध
॥१॥

पद. (विश्वामित्र सभे आला॥ भाग०)

पाहुनि ऐशा चरिताला॥ मुनिवर वदती विप्राला॥ धृ०॥
कमंडलु दर्भ करीं असुचे॥ असती साह्य करूं तुमचे॥ आ-
शीर्वादात्मक वाचें॥ कथितों जाणा अजि साचें॥ चाल.॥
करा आरंभ समराला॥ मुनिवर वदती उभयांला॥१॥

अशी त्या ब्राह्मणाची आज्ञा श्रवण करून भीमसेन शल्य राजावर धांवू-

न गेला आणि अर्जुन कर्णावर धांवून गेला. दुर्योधनादि सकल क्षत्रिय ब्राह्मणांवर धांवून गेले. आणि मोठ्या निकरानें युद्ध करूं लागले.

विदूषक.- एकूण अशी काय गर्दी जाहली! बरें तर अर्जुनानें जो कर्णा समागमें संग्राम केला तो तर सांगा पाहूं.

सूत्रधार.- सांगतों बाबा, त्या काळीं अर्जुनानें धनुष्याचें आकर्षण करून तीक्ष्ण बाणानें कर्णास व्याप्त केलें. असेंपाहून राधासुत पार्थावर बाणाचा वर्षाव करूं लागला. तेव्हां कर्णाचे वेगवान बाण आले हें पाहून अर्जुनानें बाणाच्या योगें करून सर्व सैन्याचा नाश करून कर्णासही व्याप्त केलें. त्या काळीं कर्ण ह्मणाला.

पद. (रामजोशी याची चाल.)

विप्रवरा अजि भाससि मजला विक्रमिं यशशाली॥ श्रीमद्विष्णू भार्गव नर बा मद्वृत्ती धाली॥ धृ०॥ बाहुविक्रमें झालों बहु मी तृप्त भटा समरीं॥ शस्त्रास्त्रामधें परम निपुण तूं गमसी मज अंतरीं॥ क्रोधाविष्ट मी संगरिं होतां नटिके नरकेसरी॥ पार्था वांचूनि समर्थ नाहीं मघवा या भूवरी॥ चाल॥ ह्मणउनि वदतों बाहे॥ हे वीरा तुजला पाहें॥ संतुष्ट मानसीं आहें॥ चाल॥ प०॥ सखाराम प्रभु गोकुळपति हरि त्राता वनमाली॥ श्रीमद्विष्णू०॥ १॥

विदूषक.- समरंगणीं कर्णानें अर्जुनाची स्तुति केली ना! हो ठीकच आहे कारण पार्थाचा पराक्रम तसाच आहे. असो पुढें काय झालें तें तर सांगा पाहूं.

सूत्रधार.- मारिषा सांगतों ऐक. कर्णानें असें भाषण केल्यावर अर्जुन ह्मणाला, "हे कर्णा, मी धनुर्वेद वेत्ता नाहीं अथवा भार्गवरामही नाहीं. सकलवर्णांत अग्रगण्य ब्राह्मणज्ञातीय गुरुरूपें करून ऐंद्रनामक अस्त्रांत मी प्रवीण आहें, हे वीरा तुला या संग्रामाचे ठायीं पराजित करावें, ह्मणून प्राप्त झालों आहें!" नंतर कर्णानें आपल्या मनांत असा विचार केला कीं, "ब्रह्मतेज अनिवार आहे आतां युद्ध करून परिणाम नाहीं!" असें ह्मणून तो युद्धापासून परावृत्त झाला.

विदूषक.- बरें हा एक प्रकार झाला. तसेंच भीमानें सैन्यांत धुमाकु-

ली काय केली ? ती तर सांगा. मला असें झालें आहे कीं कधीं लग्नाचें मिष्टान्न भक्षण करीन, तुह्मांस काय होतें बाबा.

सूत्रधार०- भीमसेनानें सकल सेना-सागरांत दंगा करून बहुत योध्द्यांसी कृतांतसदनीं पाठविले. नंतर शल्य राजाशीं द्वंद्वयुद्ध करून त्यास पराजित केलें तो आवेशानें शल्यास पृथ्वीवर पाडून त्याचा वध करीत नाहीं, असें पाहून सर्व क्षत्रियांस शंका प्राप्त झाली. आणि बोलूं लागले कीं, हा बलिष्ठ ब्राह्मण आहे तरी कोण? त्यास विचारावें. मग कित्येक राजे भीमास विचारूं लागले.

श्लोक. पूर्वार्ध (शार्दूलविक्रीडित.)

आहां कोण्हिल कोण भूप अथवा विप्राग्र्यचूडामणी॥ भू-
माजी निज देश कोण तुमचा सांगा अह्मां ये क्षणीं॥

( तेव्हां श्रीकृष्णानें त्यास उत्तर केलें )

श्लोक. उत्तरार्ध.

धर्मे द्रौपदि लाधली झगडतां वायां कसें येउनी॥ जावें-
गीं सदनीं स्मरवें न तरि हो कोल्हाळ माजे रणीं॥ १॥

श्लोक. (इंद्रवज्रा.)

श्रीकृष्णवाक्या परिसोनि कानीं॥ भूपाल आशा त्यजुनी
स्वयानीं॥ गेले महीपालक देशिं साचे॥ वाखाणुनीस
यश त्या द्विजांचें॥ १॥

विदूषक०- भागवत बावा, एकुण असी गमत उडाली. मग पुढें काय वर्तमान झालें तें सांगा, तें खरलें विझालें असल्यास गरिबांस मिष्टान्नाची चंगळ होईल ह्मणून ह्मणतों.

सूत्रधार०- तूं तर मोठा विचक्षण आहेस एके ठिकाणीं बसून सर्व ब्रह्मांडाचा समाचार घेऊं पाहतोस.

विदूषक०- अहो सूत्रधार काका, तुह्मी रागावूं नका. माहित नाहीं ह्मणून विचारितों.

सूत्रधार०- बरें तर सांगतों ऐक. बलिष्ठ ब्राह्मणांनीं सभेचा पराजय करून याज्ञसेनीचें हरण केलें. असें भाषण करित जनांचा समुदाय आपाप-

त्या गृहीं जाऊं लागला.

### ओंवी.

झालिया सर्व शत्रु दमन ॥ करूनि कृष्णाजिन परिधान ॥
पांचाल कन्येसह वर्तमान ॥ भीमार्जुन निघाले ॥ १ ॥

विदूषक०- आतां द्रौपदी घेऊन हे ब्राह्मण जाणार तरि कोठें?

सूत्रधार०- तुला नाहिं का समजलें. पांचालासहित भीमार्जुन कुंती मातेच्या दर्शनास जाणार.

विदूषक०- एकूण असें आहे काय? तर मग आपल्यास बंदोबस्ता करितां पुढें गेलें पाहिजे.


सूत्रधार०- बहुत उत्तम आहे चला तर (असें ह्मणून निघून जातात)

---

## प्रवेश १० वा.

### स्थल पांचालपुरांतील कुलाल शाला.

पात्रें-कुंती, पांडव, श्रीकृष्ण, बलदेव, धृष्टद्युम्न, द्रौपदी, पुरोहित.



कुंती०- (आपल्याशीं) काय करावें आद्यापि पुत्राचें आगमन कां होत नाहीं. त्या स्वयंवरोत्सवांत दुष्ट बुध्दि कौरव असल्या मुळें त्याणीं कांहीं विघ्न केलें असेल काय कोण जाणे. भिक्षा ग्रहणार्थ ह्मणून गेलेले माझे प्राणांहीपेक्षा अधिक जे कुंमार पांडव ते कां बरें अद्यापि येत नाहींत, दुर्योधनानें माझ्या बालकांचा घात तर केला नसेल ना! (किंचित् विचार करून) व्यासनारायणाच्या वचनांत कसें विपरीतत्व येईल.

(इतक्यांत द्रौपदी सहित पांडव प्रवेश करितात)

भीमार्जुन०- (द्रौपदीस घेऊन) हे मातुश्री, आजही भिक्षा आणिली आहे.

कुंती०- (द्रौपदीस न पाहतां) हे पुत्रहो जी भिक्षा आणिली असेल ती सर्वांनीं विभाग करून घ्यावी (अंतर्गृहांतून बाहेर येऊन व पाहून) हरहर परमेश्वरा, काय ही विपरीत वाणी बोलिलें. आतां करावें तरी काय! पहा हे केवढें धर्म संकट प्राप्त झालें.

श्लोक. (कामदा.)

काय मी करूं धर्मसंकटा॥ केंवि बोलिलें वाक्य ओरवटा॥ चित्ति सौख्य ना नष्टकल्पना॥ वाव जाहली माझि जल्पना॥ १॥

(द्रौपदीस हातीं धरून) शिव शिव! काय मी अप्रसंगीं वाणीचा उच्चार केला. (असें ह्मणून मुहूर्तमात्र स्तब्ध होऊन धर्मास लक्षून) हे पुत्रा ही पांचालराजाची कन्यका तुझ्या कनिष्ठ बांधवांनीं आणून मला निवेदन केलें कीं, आह्मीं भिक्षा संपादन करून आणिली आहे ते वेळीं नित्य क्रमाप्रमाणें मी पुत्रांस ह्मणालें कीं सर्वांनी विभागून तिचा उपभोग करावा.

साकी

यास्तव धर्मा माझें भाषण अनृत कदापि न व्हावें॥ पांचालीनें धर्मच्यूतता न घडो हेंचि करावें॥ ह्मणवूनि कथितें कुमरा हे॥ असो मान्य नर अमरा हें॥ १॥

धर्म०- (मुहूर्तमात्र चिंता युक्त होऊन आणि मातेस आश्वासन देऊन) अर्जुना, सांगतों श्रवण कर. मच्छयंत्राचा भेद करून पांचालीचें हरण केलें स ह्मणून ती तुझीच धर्मपत्नी होवो.

**अर्जुन**०- हे ज्येष्ठ बांधवा, अशिष्टा सारिखा धर्म मीं कदापि करणार नाहीं. जेणेंकरून मी अधर्मगामी होईन अशी प्रेरणा करूं नको.

ओंवी

युधिष्ठिरा पाणिग्रहण॥ प्रथमतां करावें आपण॥ तद-
नंतर भीमसेन॥ नंतर आह्मी त्रिवर्ग॥१॥

(असें श्रवण करून धर्मराज बोलतात.)

**धर्मराजा**०- (व्यासवचनाचें स्मरण करून.) हे बांधव हो, ही द्रौपदी सर्वांची भार्या होण्यास योग्य आहे.

**पांडव**०- (ज्येष्ठ भ्रात्याचें भाषण श्रवण करून त्याच अर्थाचें चिंतन करीत बसतात.)

(इतक्यांत श्रीकृष्ण बलराम येतात.)

**श्रीकृष्ण बलदेव**०- (भ्रात्यांसहित धर्मराज बसले आहेत असें पाहून) हे अजातशत्रो धर्मराजा; चरण कमलाचे ठायीं हे दास लीन होताहेत (नंतर कुंतीचें चरण वंदून.) आत्याबाई आपण सुखी आहांत ना!!

**पांडव**०- (अत्यानंदानें) प्रभो गोपाल कृष्णा, हे बलरामा, आह्मी येथें गुप्तपणें असतां तुह्मांस कसें अवगत झालें?

**श्रीकृष्ण बलदेव**०- (हास्य करून) अरे बाबानो, अग्नी कितीजरी गुप्त ठेविला तथापि तो कदापि प्रकट झाल्यावांचून राहणार नाहीं. तसें तुह्मी आपल्या अलौकिक पराक्रमानें कधींही लपले जाणार नाहींत. असो परमेश्वर कृपेकरून अग्निगृहांतून मुक्त होऊन तुह्मीं असा पराक्रम केला हें फार उत्तम केलें.

साकी

पुनरपि असुच्या दृष्टिस पडलां विधियोगानें सारे॥ हेंचि
सफलता आह्मि जाणतो गमलें अज सुख बारें॥१॥

(असें भाषण करून उभयतां क्षत्रियवीरांस समजून देतां आपल्या शिबिरास निघून जातात.)

(इतक्यांत द्रुपद राजा आणि धृष्टद्युम्न प्रवेश करितात.)

**द्रुपदराजा**०- (खिन्न होऊन) परमेश्वरा, करावें तरि काय? हे पुत्रा, कन्या कोणी हरण करून नेली असावी बरें कोणी नीच जातीचे मान-

त्यानें हरण केली कांय? करभार देणाऱ्या एखाद्या वैश्यानें तर नेली नसे-ल ना! ( विचार करून. ) हे धृष्टद्युम्ना तुला आपल्या भगिनी विषयीं कांहीं खेद प्राप्त होत नाहीं. त्यापेक्षां पार्थानेंच गुप्त रूपानें येऊन हरण केली का-य?

श्लोक. (भुजंगप्रयात.)

करूं काय आतां कळेना वळेना॥ नसे स्वास्थ्य चित्ता कु-
णी आढळेना॥ कशी भ्रांति मातें स्मृता प्राप्त झाली॥ कु-
ठें द्रौपदी दाखवी सौख्य वल्ली॥ १॥

पुत्रा, जें सत्य असेल तें कथन कर, मला तर असें वाटतें कीं अर्जु-नानेंच हें लक्ष्य भेदून टाकिलें असावें.

धृष्टद्युम्न०- ( हर्षित होऊन. ) तात महाराज, सांगतों श्रवण करा.

पद. (विश्वामित्र सभे आला॥ मागतो०)

कृष्णाजिन जो पांघरला॥ सभेसी द्विवा परिगमला॥ ज्येणें
गुणहि कार्मुकाला॥ लावुनि लक्ष्य भेद केला॥ ज्येणें उ-
पडिलें तरुसी॥ भिववावया क्षत्रियांसी॥ ताता त्यानें
भगिनीसी॥ नेलें स्वगृहीं निश्चयेसी॥ १॥

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

ऐसे ते नरसिंह घेउनि वधू गेले असें पाहिलें॥ ग्रामाबाहि-
र जे स्वयें निजबळें येऊनि यां शोभले॥ मागोमाग त-
साच मी बहु त्वरें कुलाल गेहांतरीं॥ गेलों तों जननीस-
मेत बसले ते पांच सिंहापरी॥ १॥

तात महाराज, ते वीर शयन कालीं काल मेघासारिखे गर्जना करीत नाना प्रकारच्या चित्र विचित्र कथा परस्पर सांगत होते. त्या शूद्र संबंधी अथ वा विप्रसंबंधी कांहीं एक नव्हत्या. त्या सर्व वीराच्या वाद गर्भित व संग्राम संबं-धी असल्यामुळें निश्चयेंकरून ते कोणी तरी श्रेष्ठ क्षत्रिय आहेत यांत संदेह नाहीं असें मला वाटतें.

अथवा.

पद. कुडें? ( विश्वामित्र सभे आला. )

अद्भुत चमत्कार झाला॥ तो तुज कथितों समयाला॥ ध्रु०
ताता मानसिं हें गमलें॥ जतुगृह त्यागुनि हे आले॥ पांडु

व रूळ मुक्त झाले ॥ हरिनें तयांसि वांचविलें ॥ चाल ॥ कथितों सत्य आपणाला ॥ अद्भुत चमत्कार झाला ॥ १ ॥

द्रुपद॰- बालका, तूं जें वर्तमान कथन केलेंस यावरून माझेही मनाचे ठायीं मोठा संशय प्राप्त झाला आहे. या करितां त्याची निवृत्ति व्हावयास कांहींतरी योग्य उपाय केला पाहिजे (अम्मळ विचार करून ) हे पुत्रा आतां अगोदर आपले पुरोहित कुलाल शाळेंत, त्या ब्राह्मणां कडे पाठवून शोध आणविला ह्मणजे निराकरण होईल तर वत्सा, आपल्या पुरोहितास पाचारण कर.

धृष्टद्युम्न॰- आज्ञा महाराज, (असें ह्मणून त्यास घेऊन येतो. )

द्रुपद॰- गुरु महाराज, चरण कमलाचे ठायीं हा दास लीन होत आहे.

पुरोहित॰- द्रुपदराजा कल्याण तुला कोणतें संकट पडलें ह्मणून माझें स्मरण केलेंस.

द्रुपद॰- महाराज, आपल्या प्रतिज्ञे प्रमाणें मच्छयंत्राचा भेद करून कोणी ब्राह्मण वेषधारी द्रौपदीस हरण करून कुलाल शाळेंत गेले आहेत त्याजकडे आपण जाऊन ते ब्राह्मण आहेत किंवा क्षत्रिय आहेत याचा शोध करून यावें.

पुरोहित॰- बहुत उत्तम आहे.

(असें ह्मणून सर्व निघून जातात.)

---

## प्रवेश ११ वा.

स्थळ. पांचाळ नगर, कुलाल शाळा.

पात्रें.

पुरोहित, पांडव, दूत, द्रुपद.



( पांडव बसले असतां द्रुपद राजाचा पुरोहित प्रवेश करितो. )

पुरोहित०- हे ब्राह्मण हो, सकल नरशार्दूलांत गणनीय महाबलाढ्य जो द्रुपद राजा तो अशी इच्छा करीत आहे कीं,

साकी.

ज्याणें केलें लक्ष्य विद्ध तो कवण जातिचा आहे॥ कवणें कुळिंचा कथितां भावें मात्र सौख्य त्या पाहे॥ परिसुनि तोषें नरवर हो॥ यास्तव सांगा सत्वर हो ॥१॥

तुह्मी कोणच्या कुळांत व कोणत्या ज्ञातींत उत्पन्न झालांत हें कथन केलें असतां सपुत्र सामात्य पांचाल भूपालाच्या हृदयकमलांत परमानंद होईल कारण कुरुवंशोद्भव, हस्तनापत्तनस्थ पंडुराजा द्रुपद नृपतीचा परम सखा होता. तेव्हां द्रुपदाची अशी इच्छा होती कीं, मी आपली कन्या पंडुराजाच्या पुत्रास अर्पण करीन ही द्रुपदाची मनीषा असल्यामुळें त्याचा हेतु पूर्ण यास यावयाचा होता त्या करितांच त्याणें स्वयंवरोत्सव केला आहे. त्यांत आपण लक्ष्यभेद केला त्या वेळीं क्षत्रियांच्या कोलाहलांत तुमच्या जातिकुलाविषयीं कांहिंच निर्णय झाला नाहीं. ह्मणून मी तुह्मा आलो.

आहे.

धर्मराज०- ( पुरोहिताचें वाक्य श्रवण करून ) वत्सा भीमसेना, द्रुपदराजा सजो मान्यपुरोहित आला आहे तो आपल्यास ही मान्य आहे याकरितां त्याचें पाद्य अर्घ्यादिकें करून पूजन कर.

भीमसेन०- धर्मदादा, आज्ञे प्रमाणें करितों ( असें ह्मणून त्याचें पूजन करितो. )

धर्मराज०- हे ब्रह्मन्, द्रुपद राजानें आपली परमप्रिय कन्या प्रतिज्ञे प्रमाणें वीरास अर्पण करण्याचा ज्या कालीं हेतु धारण केला त्याकालीं.

ओंवी.

वर्णशील कुल गोत्रपावन॥ त्याची विवक्षा नृपें आपण ॥ के-
ली होती काय जाण॥ कीं भेदिल लक्ष्य त्या देणें ॥ ॥

दिंडी.

लक्ष्यभेदिल त्या देउं कन्यकेला ॥ नृपति वदला तदुपरिच योग
ग्झाला॥ सांग जाउनि रायासि स्फुरवें आतां॥ नको संताप
पूं व्यर्थ भूपनाथा॥ १॥

तर मुनिवर्य आपण जाउन द्रुपदास सांगावें कीं, राजा तुझ्या प्रतिज्ञेप्रमाणें कृष्णाजिन धारण केलेल्या या ब्राह्मणानें सर्व पृथ्वीपालांच्या समुदायांतून तुझी कन्या हरण केली याकरितां तूं आतां क्रोध करण्यास योग्य नाहींस हें कर्म करणारा अन्य मानव या जगतीतलाचे ठायीं दुर्लभ आहे

( इतक्यांत द्रुपद राजाकडून दूत येतो. )

दूत०- महाराज, पांचाल राजानें वर पक्षीय मंडळीस विवाह समयीं भोजन द्यावया करितां षड्रस अन्न निर्माण करून ठेविलें आहे, याकरितां आपण रथांत बसून द्रुपद राजाचे मंदिरांत भोजनास चलावें, ह्मणजे द्रौपदीच्या पाणिग्रहणाचा समारंभ त्या स्थळींच होईल.

धर्मराज०- बहुत उत्तम आहे ( असें ह्मणून पुरोहितास जाण्यास आज्ञा देतो व त्याप्रमाणें तो निघून जातो. ) भीमार्जुनहो. राजाकडील निमंत्रण आलें आहे तरं तिकडे चलावें.

बांधव०-श्रेष्ठ बांधवा, आज्ञा. ( असें ह्मणून द्रौपदी कुंती सह रथांत

सर्व बसून चालूं लागतात.


( इतक्यांत पडदा पडतो. )

---

## प्रवेश १२ वा.

### स्थळ, पांचाल नगरांतील राजमंदिर.

पात्रें.- द्रुपद राजा, पांडव, व्यासो नारायण. आणि सेवक.



द्रुपद.- ( सचिंत बसून आपल्याशीं. ) काय करावें पुरोहितास पाठवून ही त्या वराचा कुलनिर्णय झाला नाहीं. त्यामुळें अंतः करणास स्वस्थता नाहींशी झाली आहे ( इतक्यांत पांडव राजमंदिरांत प्राप्त होतात व कुंती, पांचाळीस घेऊन द्रुपदराजाच्या अंतःपुरांत जाते )

द्रुपदराजा.- ( पांडवांचा सत्कार करून आसनावर बसवून, षड्रस भोजन अर्पण करून आपल्याशीं. ) काय पहा चमत्कार झाला आहे. अद्यापि या ब्राह्मणा विषयीं निर्णय होत नाहीं. यांचे परिक्षे करितां. सुवर्णपात्रांत नाना प्रकारचे पदार्थ, उत्तमोत्तम कुंडलादि भूषणें वर्ती धारण केलेल्या

दासी आणि दास सिद्ध केले असतांना हे वीर भोजनोत्तर एकाएकीं पदार्थालयाकडे गेले आहेत तेव्हां तिकडील काय चमत्कार आहे तो समजला पाहिजे (उघड) सेवका, तूं त्या वीरांचे पृष्ठभागीं जाऊन काय चमत्कार होतो. तो अवलोकन कर.

सेवक०- आज्ञा महाराज, (असें ह्मणून पांडवांचे पाठोपाठ जाऊन येतो) महाराज ते वीर पदार्थालयांत नानाप्रकारचे पदार्थ अवलोकन न करितां ज्याठिकाणीं कवचें, चर्मे, खड्गें, गदा इत्यादिक ठेविले होतें तेथें जाऊन स्वस्थ पहात बसले, याजवांचून दुसरा कांहीं चमत्कार नाहीं.

द्रुपदराजा०- (विस्मित होऊन) या वीरांचीं लक्षणें पाहून मला तर असा भास होतो कीं, हे पांडवच असावेत. आतां त्यास प्रत्यक्षच विचारूं. ह्मणजे मनाची भ्रांती फिटेल. (असें ह्मणून त्यांच्याजवळ जातो.)

द्रुपदराजा०- (विनयानें) हे विप्रहो,

पद. (दर्शनें पवित्र मी झालों.)

सांगा कवण तुह्मी मजला ॥ सांप्रत विप्र भले गमलां ॥ भूवरि देवापरि रमलां ॥ अजवरि कुठवर तुह्मी भ्रमलां ॥
चाल ॥ ब्राह्मण-क्षत्रिय वैश्य-शूद्र कीं ॥ आहां बहु श्रमलां ॥ सांगा कवण० ॥ १ ॥ कृष्णा प्राप्तीस्तव जाणा ॥ केलें मम पुरिं आगमना ॥ भासतां देव तुह्मीच मना ॥ चाल ॥ कुलनिर्णय हो शीघ्र व्हावया ॥ करितों प्रश्न भला ॥ सांगा-कवण० ॥ २ ॥

धर्मराज०- (पांचाल राजाचें भाषण ऐकून) राजा, सांगतों, श्रवण कर.

श्लोक (वसंततिलका)

चित्तांत खेद न करीं, कुरुवंशिं पाहें ॥ जो ख्यात पांडु नृपती जगतांत आहे ॥ तत्पुत्र हे सकल बा स्वमनांत आणीं ॥ दैवें करूनि भ्रमलों बहु दीन वाणी ॥ १ ॥

साकी.

कुंतीसुत मी ज्येष्ठ युधिष्ठिर भीमार्जुन हे पाहीं ॥ माद्रेसम्भिध माद्रितनय ते संशय उरला नाहीं ॥ स्वरूप.

तूं जाल्लासी शया ॥ करिबा करुणेची छाया ॥ ॥

( असें धर्मराजाचें भाषण श्रवण करून द्रुपदराजास अत्यानंद होतो. )

द्रुपदराजा॰ ( संतोषानें. ) हे कुरु कुल भूषणा, तुह्मी मातेसह जतुगृहांतू- न कसे मुक्त झालां, हें मला सत्वर सांगा.

धर्मराज॰- पांचाल राजा, सांगतों श्रवण कर. पूर्वी असें झालें कीं बलानें भीम सेन अधिक, आणि शस्त्रास्त्रांत अर्जुन अधिक. असें असल्यानें दुर्योधन, कर्ण, शकुनी हे अत्यंत द्वेष करूं लागले. राजा धृतराष्ट्र हा पुत्र मोहांत बद्ध झाला तेव्हां त्या दुष्टांनीं अनुसरून पित्यानें आम्हांस मा- तेसह वारणावत नगरांत पशुपतीच्या उत्सवाचे निमित्तें करून दान ध- र्म करण्या विषयीं आज्ञा केली. त्या प्रमाणें आह्मी रथारूढ होऊन वारणा- वतींत जों येतों तों त्याच्या पूर्वींच दुर्योधनानें पुरोचन नामक ( यवन ) सचिवास आज्ञा करून पुत्रांसहित एथा मातेचा दाह करण्या करितां लाक्षागृह निर्माण करून ठेविलें होतें त्यांत आह्मी जाऊन राहिलों तेव्हां विदुर काकानें अंतर्ज्ञा- नानें जाणून सर्व वृत्त बर्बर भाषेंत कथन केलें. आणि खनकाकडून दोन योज- नें पर्यंत विवर करवून गंगेंत एक नौका आह्मां करितां करून ठेविली पुढें एके दिवशीं पंचपुत्रांसह एक निषादी येऊन त्या मंदिरांत राहिली होती. त- साच तो पुरोचनही निद्रागत जाहला. अशी संधी पाहून भीमसेनानें त्या जतुगृहास अग्नि लाविला. आणि आह्मी मातेसह त्या विवरद्वारानें मध्य रात्रीं गंगातीरीं प्राप्त झालों. पुढें विदुर काकानें ठेविलेल्या नौकेंत आरोहण करून यथेच्छ वनविहार करूं लागलों. मागें अशी ख्याती झाली कीं, पांडव मातेसहित जतुगृहांत दग्ध झाले. द्रुपदराजा, आमच्या मुक्ततेचा हा सर्व प्रकार एक श्रीगोपाल कृष्णाच्या कृपेनें झाला नाहीं तर प्राणांत सं- कट प्राप्त झालें असतें.

द्रुपद॰- हर हर! काय हा विपरीत प्रसंग! पहा दुर्योधनानें दुष्टपणा करून पांडवांस उपद्रव दिला हे एकपक्षीं असो परंतु धृतराष्ट्रानें तें पुत्रांचें कप- ट मान्य करून वारणावतीस जाण्या विषयीं पांडवांस आज्ञा देऊन शेव- टीं अनर्थ केला धिक्कार असो त्या अंधास! ज्यानें कृष्ण भक्तांचा अपराध केला त्याचें कल्याण कदापि होणार नाहीं. असो! धर्मराजा, सांगतों श्रवण

कर. सुखदुःख जें भोगणें आहे तें केवळ प्रारंब्धाच्या अधीन आहे याकरितां त्याचा खेद मानून उपयोग काय? परंतु आणखी असें सांगतों कीं तुमचें राज्य तुम्हांस प्राप्त करून देईन कांहीं काळजी करूं नका.

धर्मराज०- राजा बहुत उत्तम आहे. सर्व परी आमचें कल्याण करणें आपल्याकडे आहे.

द्रुपदराजा०- असो धर्मराजा, आतां पुण्य दिवशीं अर्जुना सह वर्तमान कृष्णेचा यथाविधि परिग्रह करावयाचा आहे.

धर्मराज०- हे नर शार्दूला, मलाही भार्या संबंध करावयाचा आहे.

द्रुपदराजा०- हे कुरुकुल वर्धका, तुझ्या मनांत जें अभीष्ट असेल तें कथन कर.

धर्मराज० साख्या.

हीं नव कन्या कृष्णा नृपते पांचांची हो भार्या॥ मन्मातेनें वर दिधला हा॥ सांग कराया कार्या॥१॥ जरि कृष्णानें पण जिंकुनियां केलें कृष्णा हरण॥ तरि सर्वांची कांता होइल यास्तव केलें कथन॥२॥ ह्मणवुनि धर्में करुनि जाहली महिषी अमुची राया॥ नव कन्या ही नय निरखी गा भाषण नचहें वाया॥३॥

द्रुपदराजा०- कुरुनंदना, एका पुरुषास बहुत स्त्रिया योग्य आहेत, परंतु एका स्त्रीस बहुत पती कोठें मीं श्रवण केले नाहींत. यास्तव लोक व वेद यास विरुद्ध अधर्माचरण कसें करितोस.

धर्मराज०- महाराज, सनातन धर्माची गती फार सूक्ष्म आहे. यामुळें आह्मी कांहीं जाणत नाहीं. परंतु आमच्यापेक्षां जे वृद्ध पूर्वज आहेत त्यांणीं जो धर्म आचरण केला त्याच पंथानें आह्मी गमन करितों.

द्रुपदराजा०- बहुत उत्तम आहे. आतां तुझी कुंती माता तूं आणि माझा पुत्र धृष्टद्युम्न असे एकत्र होऊन उद्यिक याचा विचार करूं.

धर्मराज०- पांचाल राजा, बहुत उत्तम आहे (असें ह्मणून पांडव द्रुपदानें दिलेल्या मंदिरांत रहावयास जातात. व द्रुपद अंतःपुरांत जातो.)

दुसरेदिवशीं संकेताप्रमाणें सपुत्र द्रुपद कुंती व धर्मराज या सह व्यास नारायण येतात.)

द्रुपद राजा.- (आसन देऊन व पूजा करून) हे भगवन् एक स्त्री बहुतांची पत्नी कशी होईल. कदाचित् झाली असतां संकर होणार नाहिं काय? याविषयीं मजला निर्णय सांगावा.

व्यासनारायण.- द्रुपदराजा, सांगतों श्रवण कर, हें लोकविरुद्ध आणि वेदविरुद्ध आहे असें जर तुला निश्चयेंकरून वाटत असेल तर याजविषयीं तुमचीं कस कशीं मतें आहेत तीं मला निवेदन करा.

द्रुपद राजा.- साक्या.

एकस्त्री बहुतांची कांता पूर्वी कोठें नाहीं॥ झालेली हें श्रुत
नच अजवरि नय शोधुनियां पाहीं॥ १॥ विद्वज्जन बहु मा-
गें झाले त्यांणीं या धर्माला॥ अंगीकृत नच केलें सद्या जा-
ण मुख्य वर्माला॥ वास्तव मी या विरुद्ध धर्मा इच्छित ना-
हीं आतां॥ जगता माजी हें विपरीतचि निरखीं तूं मुनिना-
था॥ २॥ ॥

धृष्टद्युम्न.- भोतपोधना, व्यासा,

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

धर्माचा बहुसान बंधु तिसरा पार्थाख्य जाणा बरा॥ तत्कां-
ता मम जामि हो द्विजवरा पावूनियां आदरा॥ झालों कुं-
ठित धर्मराज वचनीं आतां करावें कसें॥ तें बोधा मजला-
गि शीघ्र पुसतों बद्धांजुळी मी असें॥ ॥

ह्या धर्म किंवा अधर्म याचा निश्चय करण्यास मी असमर्थ आहें परंतु माझी भगिनी कृष्णा पांच जणांची कांता कशी होईल? याचा निश्चय करून आपणच सांगावें ह्मणजे झालें.

धर्मराज.- भो व्यास नारायणा, माझी वाणी कधींही असत्य व्हावयाची नाहीं वास्तव मीं जें भाषण केलें तो माझा धर्मच आहे

अभंग.

पुराणीं प्रसिद्ध गौतम कन्यका॥ जटिलाभिध देखा ही-

तीजाणा ॥ १॥ सर्वधर्मवेत्ती असुनी नियेनें ॥ केलेप-
तिमानें सप्त ऋषि ॥ २॥ मुनिकन्या वार्क्षी दहाप्राचेतसा-
॥ दिधलीपरिसा बंधूतेही॥ ३॥ सखाराम प्रभु पितृस्व-
साकुंती नियेची वचनोक्ती मान्य आम्हां॥ ४॥

कुंती०- बादरायणमुने अन्ताला पासून मला जेव्हां अतिशय भय उत्पन्न झालें तेव्हां मीं हें व्रत धर्मराजास कथन केलें असतां त्यानें मला असें सांगितलें कीं ही कृष्णा आम्हा पांचाजणांची भार्या होईल.

व्यास०- ( अंतःकरणांत विचार करून. ) हे पांचाल राजा, हा सनातन धर्म मीं तुला कथन केला. आतां युधिष्ठिरानें जें तुला सांगितलें त्याप्रमाणें तूं निःशंक पणानें कर.

( असें बोलून द्रुपदराजाचा हस्त धरून अंतःपुरांत जाऊन. )

हे द्रुपदराजा, सांगतों श्रवण कर. पूर्वीं नैमिषारण्याचें गायीं सर्व देव मिळून यज्ञ करीत होते. त्यासत्रांत यमधर्म पशुवध करीत होता यम त्या यज्ञांत दीक्षित असल्यामुळें त्याणें विश्वाचा संहार केला नाहीं. म्हणून प्रजेच्या मृत्युकालाचें अतिक्रमण होऊन प्रजावृद्धि बहुत झाली. असें पाहून इंद्रादिदेव ब्रह्मदेवासन्निध जाऊन म्हणूं लागले कीं,

साकी.

महिवरि मानव वृद्धिंगत बहु झाले म्हणउनि जाण॥
उद्भवलें मनिं भय अजि धात्या हा मोठा अपमान ॥ १॥
अंतर उभयामधिं नाहीं॥ यास्तव कथितों लवलाही॥ ॥

असें देवांचें भाषण श्रवण करून ब्रह्मदेव म्हणतात तुम्ही यमाचे सत्रांत गमन करा. नंतर सर्व जावयास निघाले तों मार्गांत भागीरथी अवलोकन करून तेथें मुहूर्त मात्र उभे राहिले तों त्या महानदींत एक उत्कृष्ट कमल निरखून सकल देवतांस परमानंद जाहला. त्या सर्व देवसमूहांत वासव पराक्रमी होता म्हणून त्यानें गंगेच्याउगमापर्यंत कमलग्रहणाच्या इच्छेनें गमन केलें असतां तेथें एक अग्निप्रभे सारखी देदीप्यमान स्त्री सरितेंत स्नान करून उदकाच्या इच्छेनें रोदन करीत बसली होती. तिच्या नेत्रांतून जें जलबिंदु नदींत पडत, त्यांपासून कमलें उत्पन्न होत.

असें अघटित कृत्य पाहून इंद्र तिच्याजवळ गेला.

श्लोक. (अनुष्टुप्छंद.)

जान्हवीच्या तटाकीं तूं ॥ करिसी रोदनासि कां ॥ कथी
कारण तें मातें ॥ नधरीं मानसीं भय ॥ १ ॥

असें इंद्राचें भाषण श्रवण करून स्त्री बोलते. हे अमरेंद्रा, मी मंदभाग्या आहें. मी शोक व दुःख करिते याचें कारण माझ्या मागें ये ह्मणजे सहज तुझ्यां लक्षांत येईल. मग बरें आहे असें ह्मणून इंद्र त्या स्त्रीच्या पृष्ठ भागीं गेला तो हिमालयाच्या मस्तकावर सिद्धासनस्थ भार्येसहित अक्षक्रीडा करणारा असा पुरुष पाहून.

इंद्र०- हे भगवन्, मी अमरेंद्र आहें.

(क्रीडेंत निमग्न असल्यामुळें देवेंद्राकडे त्यानें पाहिलें नाहीं.)

इंद्र०- (क्रोधाविष्ट होऊन.) हे पुरुषा, तूं अक्षक्रीडेमध्यें अति उन्मत्त झालास या कारणानें मला जाणत नाहींस काय? मी सर्व देवतांचा स्वामी आहें

(असें ह्मणून हस्तामध्यें चक्र घेऊन त्याचा संहार करण्यास उद्युक्त होतो.)

शंकर०- (इंद्राची कृति पाहून मंदहास्य पूर्वक अवलोकन करितात.)

इंद्र०- (आपल्याशीं.) काय, चमत्कार सांगावा, हा पुरुष अक्षक्रीडेंत तर निमग्न आहेच तशांत वक्र दृष्टीनें माझ्याकडे अवलोकन करितांच माझी अवस्था स्थाणूसारखी झाली. आतां करावें तरी काय!

(अक्षक्रीडा समाप्त झाल्यावर.)

शंकर०- हे स्त्रिये, या इंद्रास माझ्या सन्निध आण. ह्मणजे याचा गर्व अगदीं निःशेष करून टाकितों. कारण बहुत प्रमत्त झाला आहे.

स्त्री०- आज्ञा महाराज (असें ह्मणून तिनें शक्रास स्पर्श केला व तो अशक्त होऊन पृथ्वीवर पतन पावला.)

शंकर०- (आपल्यास.) हा इंद्र तर अगदीं हतवीर्य होऊन पडला आहे तर याजवर अनुग्रह केला पाहिजे. (उघड)

पद कडवें. (भजलावरिल सुभद्रा काय.)

शक्रा न करि गर्वातें ॥ कथितों साच तुला ॥ धृ० ॥ या नगिं आहे विवर एक ॥ शौर्य तेजें करूनि देख ॥ वासकरूनी पांच

हीं सौख्य ॥ राहीं चोख तें ठायीं ॥ शंका० ॥ १ ॥

अशी आज्ञा होतांच गणांनीं तें विवर इंद्रास दाखविलें तों त्यांत तेजस्वी चार इंद्र पाहून व सभय होऊन.)

इंद्र०- हर हर! या चार पुरुषांची जशी गती जाहली आहे तशी माझी होणार काय! (असें म्हणून दुःख करितो.)

शंकर०- (ताम्रास होऊन.) हे शतक्रतो वासवा, पूर्वी तूं मूर्खपणानें माझा अनादर केलास त्यापेक्षां आतां तूं या पर्वताचे दरींत वास कर.

इंद्र०- (भयभीत होऊन स्तवन करितो.)

पद (तसु तसुची करूनि बेतणी तक्त०)

शिव शिव शंकर हिमनगजा धव दयार्णवा पावगा ॥ नतरी कष्ट पावतों उगा ॥ ध्रु० ॥ भक्त काम कल्पद्रुम देवाधीवे त्रिपुरांतका ॥ पाहसी माझा तरी अंत का ॥ तुजविण मजला नाहीं कोणी भव मग्ना पावरे ॥ भासे वैभव मज वावरे ॥ सखाराम प्रभु स्थिर चर व्यापक देऊन कां तूं दगा ॥ दास मी काय असें वाउगा ॥ शिव० ॥ १ ॥

श्लोक (कामदा)

धांव पाव तूं शंकरा मला ॥ दुःख शैल हा तीक्ष्ण भासला ॥ यामुळें नसे सौख्य ये धवा ॥ पाव सत्वरें दीन बांधवा ॥ १

शंकर०- (अभय देऊन.) हे अमरेंद्रा, आजपासून दुसरे इंद्र या गव्हरांत कधींही यावयाचे नाहींत. तूं आपल्या मनांत कांहीं काळजी करूं नको

साकी.

मानव लोकीं जन्मुनि अद्भुत कर्में कराल नाना ॥ सर्वी चालय करुनि ॥ शेवटीं यावें अपुलें स्थाना ॥ १ ॥

पद. (केलिस अशी काय परीक्षा.)

कथिलें तुह्मां सर्व आतां स्मरण हें धरा ॥ महीमाजि जाउनि स्वयें कर्म आचरा ॥ ध्रु० ॥ अघटित बहु कृत्य करुनि तोषवा जना ॥ त्रिजगिं दिजयि व्हावें सकरवी पूर्ण कामना ॥ देवापरि वास करी नाहिं यातना ॥ चाल ॥ सखा-

रामहृद यिं धरुनि कार्यसांवरा ॥ कथिलें तुम्हांस सर्व
आतां स्मरण हें धरा ॥ महिमा० ॥ १ ॥

(असें महादेवाचें वाक्य श्रवण करून विवरस्थ इंद्र बोलतात.)

विवरस्थ इंद्र० - भो अनंत कोटि ब्रह्मांड नायका, सकल विश्व चालका, आपल्या आज्ञेप्रमाणें आह्मी कर्मभूमीवर जाऊन मानवांचें जन्म घेतों परंतु आमच्या मातेच्या गर्भी, धर्म वायु इंद्र आणि अश्विनी कुमार यांणीं प्रवेश करावा ह्मणजे आम्ही सर्व कृत्यें करितों. पुढें नाना प्रकारच्या दिव्यास्त्राच्या योगेंकरून युद्धांत दुष्टांचा संहार झाल्यावर इंद्र लोकीं प्राप्त होतों परंतु या सर्व कृत्यास आपला आश्रय असावा.

(असें पूर्व इंद्रांनीं भाषण केलें असतां.)

इंद्र० - कैलासनाथ, माझ्या पराक्रमासमान एक मी पांचवा पुरुष देईन.

व्यास० - द्रुपद राजा, त्या पांच इंद्रांचीं नामें सांगतों तीं श्रवण कर.

साकी.

विश्वभुज शिबी आणिक शांती तेजाधिप तो तैसा ॥ भूतधाम नामक ही परिसें घडला प्रकार ऐसा ॥ साह्य शंकरया झाला ॥ ऐकें सुंदर चरिताला ॥ १ ॥ त्याचे पूरित कामकराया उमापती बहु भागे ॥ आतां न धरीं संशय राजा कार्य करावें वेगें ॥ इच्छित जाणुनियां आतां ॥ चालवि पांचा वरि सत्ता ॥ २ ॥

श्लोक (शार्दूल विक्रीडित)

पांचांतें वनिताच एक असणें जाणोनि देवें भली ॥ स्वर्गीची कमला सुरवें महिवरी त्वद्दशिबा प्रेषिली ॥ वेदीपासुनि जन्मली तव सुता कोठें नृपा पाहिलें ॥ ऐसें हें विभुसूत्र कांहिं न कळे संधान जें साधिलें ॥ १ ॥

नंतर शंकर त्या पांच इंद्रांस समागमें घेऊन नारायणाचे आश्रमिं गेले, तेव्हां नारायण बोलले, हे इंद्रहो, तुह्मी पृथ्वीवर अवतार धारण करून भूभार हरण करावा.

पांच इंद्र० - आज्ञा महाराज, (असें ह्मणून ते नमन करिते झाले.)

(नंतर नारायणानें आपले सित ह्मणजे श्वेत आणि कृष्ण ह्मणजे काळा. असे दोन केश उपटून यदुकुळांत टाकिले असतां श्वेतकेशांश बळराम. आणि कृष्णकेशांश श्रीगोपाल कृष्ण पूर्ण ब्रह्म यशोदेच्या टायीं उत्पन्न झाला.)

व्यास०- हे द्रुपदराजा, पूर्वी हिमालयाचे दरींतील चार इंद्र सांगितले ते व साक्षात् इंद्र असे पांच पांडव अवतीर्ण झाले. पार्थ साक्षात् प्राप्त झालेल्या इंद्राचा अंश जाण. आणि धर्मादि ते चार आणि जी स्वर्गलक्ष्मी ती मायारूपें मनुष्य लोकीं यांची भार्या होण्या करितां अवतरली आहे.

साकी.

तवसंशयस्कृनिवृत्ती करितां योगबलानें देतों॥ दिव्यचक्षु मी तुजला आतां अनुभव त्याचा घेतो॥ पांडवनिरखीं नृपराया॥ नकळे श्रीहरिची माया॥

(असें ह्मणून दिव्य दृष्टि देतो.)

द्रुपद०-(पांडवांस अवलोकन करून.) भो व्यासनारायणा, मला तर केवळ पांडव दिव्य हेम किरीट व पुष्पांच्या माला धारण करून सूर्या सारिखे तेजस्वी व आकृतीनें इंद्राप्रमाणे दिसतात आणि त्यांचे सन्निध साक्षात् श्रीरूपिणी चपलेसारखी देदीप्यमान पांच पतींस एकच शोभणारी अशी पांचाली मी पाहतों. या योगानें मला बहुत आनंद झाला आहे. आतां आपण जी आज्ञा कराल ती मान्य करितों.

व्यास०- राजा आतां पांडवांस जामात करून कृष्णेचा लग्न सोहळा करावा.

द्रुपद०- आज्ञा महाराज, (असें ह्मणून व पूर्वस्थळीं येऊन सर्व सिद्धता करून.) हे धर्मराजा, तुह्मां सर्व पांडवांस आजचा दिवस फार शुभप्रद आहे व चंद्रमाही अर्थसिद्धिकर्ता आहे त्यापेक्षां आज तुह्मीं सर्वांनीं यथानुक्रमें कृष्णेचें पाणिग्रहण करावें.

धर्मराज०- आज्ञा महाराज,


(असें ह्मणून सर्व निघून जातात.)

(नंतर पडदा पडतो.)

## प्रवेश. १३.

### स्थळ-पांचालपुरांतील पाठशाला।

पात्रें- सूत्रधार, विदूषक, रामचंद्रदीक्षित, सदाशिव भट्ट



रामचंद्र०- ( सदाशिव भट्ट बाहेरून आलेले पाहून ) नमो नमः यावें यावें आता शा तुमची फारच धांदल उडाली आहे तर काय वर्तमान आहे तें सांगा पाहूं.

सदाशिव० - ( नमस्कार करून बसल्यानंतर. ) अहो रामचंद्र भट्टजी, तुह्मांस काय सांगावें! आज मोठा आनंदाचा दिवस आला.

रामचंद्र०- भट्टजी, असा काय आहे; तो एकदांचा प्रकट करा.

सदाशिव भट्ट०- होय, ऐका महाराज, द्रुपदराजाच्या प्रतिज्ञे प्रमाणें सर्व राजे असतां ज्या ब्राह्मणानें मत्स्य यंत्राचा भेद केला तो अर्जुन.

रामचंद्र०- असें आहे काय! तर ही मोठी आनंदाची गोष्ट समजली पाहिजे बरें तें असो, लाक्षागृहांतून त्याची मुक्तता तरि झाली कशी?

सदाशिव०- अहो दीक्षित, ज्याचा सखा हरी॥ त्यावरि विश्व कृपा करी ॥ या सत्पुरुषाच्या वाक्याप्रमाणें श्रीगोपाल कृष्णाचे कृपें करून विदुराच्या प्रयत्नानें ते सजीव राहिले. आणि त्या दुष्ट पुरोचनाचा नाश झाला.

रामचंद्र०- अर्जुनास द्रौपदी अर्पण करावी असा हेतु राजाचा होता, त्या प्रमाणें ईश्वरेच्छेनें घडलें. आतां मंगलोत्सव होणारच आहे..

सदाशिवभट्ट०- असें कां म्हणतां ! आतां मास पक्षतरी पक्वान्नाची चं-गाळी होईल आणि ब्राह्मणांचें दैन्य देशांतरीं जाईल अशी दक्षिणा प्राप्त होणारी आहे आपण कांहीं काळजी करूं नका.

रामचंद्रदीक्षित०- तुह्मी राजगुरूकडे गेलां होतां ह्मणून वेणिमाधव भट्टजीनें आम्हांस सांगितलें तेव्हां राजद्वारींचें वर्तमान काय आहे तें सांगा.

सदाशिवभट्ट०- द्रुपद राजानें पांडवांस पांचाळीचें पाणिग्रहण करावें असें सांगून कृष्णेला उत्तम प्रकारचें अभ्यंगस्नान घालून नानाप्रकारच्या अलंकारांनीं भूषित करून येथें आणा असें सांगतांच धृष्टद्युम्नानें द्रौपदी भूषित करून आणिली. लग्नसमारंभास द्रुपदराजाचे बहुत आम्ही आले आहेत, तसेंच राजामात्य आणि पौरजन तहत् महान् महान् द्विजश्रेष्ठ लग्नोत्सवास आले आहेत राजाचें सकल गृह, मंडप, गोपुरें अशीं स्थानें मनुष्यांनीं व्याप्त होऊन गेलीं, रत्नकोश, धान्यकोश आदिकरून सर्व परिपूर्ण करून ठेविलीं आहेत.

रामचंद्रदी०- हा एक प्रकार झाला पुढें काय झालें तें सांगा पाहूं

सदाशिव भट्ट०- दीक्षित, श्रवण करा, नंतर पांडवांनीं मंगल स्नानें करून वस्त्राभरणें परिधान केलीं व उपाध्याय अग्रभागीं करून सभेंत आले. मग अग्नि सिद्ध करून होम केला. मग यथानुक्रमें याज्ञसेनीचें पाणिग्रहण केलें द्रुपदराजानें आपल्या जामातांस विपुल आंदण देऊन त्यांचें समाधान केलें सर्व लग्नाचा समारंभ यथासांग झाला. आतां पांडव द्रौपदीसहित द्रुपदाचे मंदिरांत स्वस्थपणें वास करितात.

रामचंद्र दी०- सदाशिव भट्ट, आतां राहिलें तरी काय हा समारंभ झाला तो ठीकच आहे परंतु आपलें कांहीं दरिद्र दूर होतें कीं नाहीं हें मला अगोदर समजूं द्या.

सदाशिव०- दीक्षित, आपण कांहीं काळजी करूं नका. देशोदेशींचे जे ब्राह्मण आले होते, त्यांची संभावना काल राजगुरूकडून झाली आतां ग्रामस्थांची मात्र व्हावयाची आहे. तर आपण त्याजला जाऊन भेटूं. ह्मणजे झालें.

रामचंद्र० - बहुत उत्तम आहे, चलावें तर.

(असें ह्मणून निघून जातात.)

(सूत्रधार विदूषक प्रवेश करितात.)

सूत्रधार० - कां विदूषका, तुला जो द्रौपदीस्वयंवराचा प्रयोग करून दाखवितों ह्मणून बोललों होतों त्या प्रमाणें या रंगभूमीवर पात्राकरवीं अनुकरण केलें आतां श्रीगोपालकृष्णास मंगलारती कर.

विदूषक० - फार उत्तम आहे. (असें ह्मणून आरती करितो.)

नंतर पडदा पडतो.

समाप्त.